cmyk

## संपादकीय

### शैक्षणिक क्षेत्रात तरी गोंधळाचे वातावरण नको

येत्या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्रातील सर्व राज्य शिक्षण मंडळांमध्येही केंद्रीय पातळीवरील सीबीएसई हा अभ्यासक्रम लागू केला जाईल, अशी घोषणा राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केल्यानंतर या निर्णयाची अंमलबजावणी कशी होणार याबाबत उलट सुलट चर्चा सुरू झाली आहे. एकीकडे महाराष्ट्रात यावर्षीचे शैक्षणिक वर्ष एक एप्रिलपासून सुरू करावे अशा प्रकारचे नियोजन सुरू असताना एवढ्या कमी कालावधीमध्ये सीबीएसईचा अभ्यासक्रम महाराष्ट्रमध्ये लागू करणे शक्य आहे का, याचा विचार या निमित्ताने करावा लागणार आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### खासदारांच्या वेतनात २४ टक्क्यांची वाढ

नवी दिल्लीः सरकारने खासदारांच्या पगारात २४% वाढ केली आहे. संसदीय कामकाज मंत्रालयाने सोमवारी याबाबतची अधिसूचना जारी केली. यानुसार, सध्याच्या खासदारांना आता दरमहा १.२४ लाख रुपये वेतन मिळेल. पूर्वी त्यांना दरमहा १ लाख रुपये मिळत होते. ही वाढ खर्च महागाई निर्देशांकाच्या आधारे करण्यात आली आहे. वाढीव पगार १ एप्रिल २०२३ पासून लागू होईल. याआधी २०१८ मध्ये मोदी सरकारने दर पाच वर्षांनी खासदारांच्या वेतन आणि भत्त्यांचा आढावा घेण्याचा नियम बनवला होता. हा आढावा महागाई दरावर आधारित आहे. दैनिक भत्ता आणि पेन्शनमध्येही वाढ करण्यात आली. दैनिक भत्ता आणि पेन्शनमध्येही वाढ करण्यात आली आहे. दैनिक भत्ता २००० रुपयांवरून २५०० रुपये करण्यात आला आहे. माजी खासदारांचे पेन्शन दरमहा २५,००० रुपयांवरून ३१,००० रुपये करण्यात आले आहे. पाच वर्षांहून अधिक काळ खासदार राहिलेल्या सदस्यांना मिळणारे अतिरिक्त पेन्शनही दरमहा २००० रुपयांवरून २५०० रुपये करण्यात आले आहे.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३३० | मंगळवार, दि.२५ मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

# अजून किती शेतकऱ्यांच्या आत्महत्या हव्यात !

## कर्जमाफीवरून नाना पटोले यांचा सरकारला सवाल, विधानसभा अध्यक्षांनी स्थगन प्रस्तावाची मागणी फेटाळली

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रातील किती शेतकऱ्यांच्या आत्महत्या राज्य सरकारला पाहिजेत, तेव्हाच राज्य सरकार शेतकऱ्यांचं कर्ज माफ करेल, असा सवाल काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी विधानसभेत सोमवारी (दि.२२) उपस्थित केला. तसेच यावेळी शेतकरी आत्महत्यावर स्थगन प्रस्तावाची मागणी केली. परंतु विधानसभा अध्यक्षांनी ती फेटाळून लावली. तर अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी तरी शेतकरी आत्महत्यांवर राज्य सरकारने निवेदन सभागृहात द्यावे, अशी विनंती विधानसभा अध्यक्षांकडे पटोले यांनी केली. त्यावर उचित कार्यवाही करण्याचे आदेश अध्यक्षांनी दिले.**



### शेतकरी आत्महत्येचा प्रश्न गंभीर

दरम्यान, महायुतीने विधानसभा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. त्यामुळे शेतकऱ्यांना राज्य सरकार कर्जमाफी करेल, अशी आशा आहे. परंतु राज्य सरकार कर्जमाफी करण्यासाठी गंभीर नसल्याचे दिसते. त्यामुळे राज्यात मात्र शेतकरी आत्महत्या वाढू लागल्या आहेत. मागील २४ वर्षात ४९ हजार शेतकऱ्यांनी जीवनयात्रा संपवली आहे. शेतकरी आत्महत्येचा प्रश्न गंभीर होऊ लागला आहे.

शेतकरी आत्महत्यावरून पटोले यांनी राज्य सरकारवर घणाघाती टिका केली. पटोले म्हणाले, ''कर्जमाफी करायला सरकार तयार नाही, शेतीमालाला भाव द्यायला तयार नाही. महाराष्ट्रात रोज शेतकरी आत्महत्या करत आहेत, ही गंभीर बाब आहे. अन्नदात्याला महाराष्ट्रात जगायला स्थान नाही, असा सरकारचा उद्देश आहे का?'' असा सवाल पटोले यांनी उपस्थित केला. तसेच २२ मार्च रोजी पहाटे एका शेतकऱ्यांने कर्जाला कंटाळून आत्महत्या केल्याचे सभागृहासमोर सत्ताधाऱ्यांनी निवेदन द्यावे, अशी मागणी पान २ वर

## थोडक्यात...

### नेत्यांचा अपमान सहन करणार नाही–फडणवीस

मुंबईः कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर केलेल्या गाण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना कडक शब्दात समाचार घेतला. नेत्यांचा अपमान सहन केला जाणार नाही, कुणाल कामराने याबाबत जाहीर माफी मागावी असा इशारा फडणवीसांना कुणाल कामराला दिला. संविधान दाखवून तुम्ही वाचू शकणार नाही असेही फडणवीस म्हणाले.

### महादेव मुंडे खून प्रकरणाचा तपास अधिकारी बदलला

बीड–महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणाचा तपास गेवराईचे पोलीस उपाधीक्षक नीरज राजगुरू यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे. महादेव मुंडे यांचे कुटुंब आणि आमदार सुरेश धस यांच्या मागणीवरून हा तपास परळी पोलिसांकडून अंबाजोगाई उपअधीक्षकांकडे देण्यात आला होता. मात्र या प्रकरणात म्हणावी तशी प्रोग्रेस होत नसल्याचे लक्षात घेता हा तपास आता गेवराई पोलीस उपअधीक्षक करणार आहेत.

### सावत्र बापाचे अश्लिल वर्तन; मुलीने गुप्तांग कापले

मुंबई–नालासोपारामधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे, मुलीने आपल्या सावत्र वडिलांवर प्राणघातक हल्ला करीत त्याचे गुप्तांग चाकूने कापले आहे. सावत्र बापाने अश्लिल कृत्य केल्याने सदरील मुलीने हे धाडसी पाऊल उचलले. या हल्ल्यामध्ये सावत्र वडील गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

### विमान प्रवाशांना सर्व माहिती देण्याचे निर्देश

नवी दिल्ली– नागरी विमान वाहतूक मंत्रालयाकडून विमान कंपन्यांना निर्देश देण्यात आले आहेत. प्रवाशांचे हक्क आणि नियमांच्या तरतुदीबाबत भर देण्याचे निर्देश दिले आहेत. प्रवाशांनी तिकिट बुक केल्यानंतर त्याची सर्व माहिती ही एसएमएस आणि व्हाट्सअपद्वारे पाठवण्याचे निर्देश आहेत. विमान कंपन्यांना वेबसाईटवरही तिकिटांची माहिती उपलब्ध करून देण्यास सांगितले आहे. प्रवाशांच्या तक्रारींबाबतही मंत्रालयाने त्वरित निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत.

### विधिमंडळ समित्यांची आज घोषणा होणार

मुंबई : विधिमंडळ समित्यांची मंगळवारी घोषणा होणार असून महायुती व महाविकास आघाडीचे एकमत झाल्याचे दिसून येत आहे. त्रुटी दूर झाल्यामुळे नियुक्त्यांचा मार्ग मोकळा झाला आहे. यात कोणाची वर्णी लागते तर कोणाला संधी मिळत नाही याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### कॉमेडियन कुणाल कामराचे सीडीआर तपासणार

मुंबई : कॉमेडियन कुणाल कामराचे सीडीआर तपासण्यात येणार असल्याची घोषणा गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत केली आहे. त्याचप्रमाणे कामराच्या खात्यात कुणी पैसे जमा केलेत का याची सुद्धा तपासणी करण्यात येणार असल्याचे कदमांनी सांगितले. कुणाल कामरावर कठोर कारवाई करण्यात येणार, असा इशारा योगेश कदम यांनी दिला आहे.

### राज्यात पुन्हा उष्णतेच्या लाटेचा इशारा

मुंबई : राज्यात पुन्हा एकदा उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला असून पुढील पाच दिवस राज्यात उष्णतेची लाट असणार आहे. मध्य आणि उत्तर महाराष्ट्रात उष्णतेच्या लाटेचा धोका अधिक असणार आहे. अनेक ठिकाणी पारा चाळिशीपार जाण्याचा अंदाज आहे.

# स्टँड अप कॉमेडियन कुणाल कामरा यांच्या गाण्यावरून विधान परिषेदत गोंधळ



**मुंबई । प्रतिनिधी**

स्टँड अप कॉमेडियन कुमाल कामरा याने महाराष्ट्रातील राजकिय परिस्थितीवर आणि दिल्लीतील पंतप्रधान मोदी यांच्यावर विडंबनात्मक गायलेले गाणे प्रसारीत झाले आणि त्या गाण्यावरून विधान परिषदेत

### कुणाल कामराच्या अडचणीत वाढ : शिवसेना कार्यकर्त्यांना जामीन

स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याच्या अडचणीत वाढ होण्याची चिन्हे शक्यता आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर स्टँडअपमध्ये कवितेच्या माध्यमातून टीका केली होती. राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी कामरा याचे सीडीआर व बँक अकाऊंट तपशील तपासणार असल्याचे म्हटले आहे. कामराच्या विरोधात सध्या वॉरंट निघाले असून पोलिस त्याचा तपास करत आहेत. दरम्यान कुणाल कामराच्या ऑफिस तोडफोड प्रकरणी ताब्यात घेतलेल्या शिवसेना कार्यकर्त्यांना जामिन मिळाला आहे. खार पोलिस ठाण्यात त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला होता. प्रत्येकी १५ हजारांच्या जातमुचलक्यावर हा जामीन न्यायालयाने मंजूर केला आहे.

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवे अन् सत्ताधारी भीडले

### अपमान सहन केला जाणार नाही–मुख्यमंत्री

या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रीया समोर आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा अपमान करणे हे चुकीचे असून, हा अपमान सहन केला जाणार नाही अशा लोकांना त्यांची जागा दाखवण्यात येईल. ते पुढे म्हणाले की हास्यविनोद करणे यात काही गैर नाही पण मोठ्या नेत्यांना बदनाम करुन त्यांचा अपमान होईल असे वक्तव्य करणे पुर्णतः चुकीचे आहे. कामरा याने माफी मागितली पाहिजे, असे फडणवीस म्हणाले.

भाजपाच्या सदस्यांनी गोंधळ घालत सभागृहाचे कामकाज बंद पाडले. तर भाजपाचे प्रसाद लाड यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी अपशब्द वापरल्याने कुणाल कामरा यास अटक करण्याची मागणी केली. यावेळी सत्ताधारी बाकावरील सर्व सदस्य कुणाल कामरा यांच्या निषेधाच्या घोषणा देत सभापतीं राम शिंदे यांच्यासमोरील मोकळ्या जागेत एकत्र जमले. त्यामुळे सभागृहात एकच गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्याने अखेर राम शिंदे यांनी सभागृहाचे कामकाज स्थगित केले.

सोमवारी विधान परिषदेचे कामकाज सुरु झाल्यानंतर या विषयीचा स्थगन प्रस्ताव विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी उपस्थित केला होता. मात्र सभापती राम शिंदे यांनी २८९ खाली दानवे यांचा स्थगन प्रस्ताव सभापतींच्या दालनातच फेटाळून लावण्यात आला. यावेळी बोलताना अंबादास दानवे म्हणाले की, सभापती महोदय मुंबईत एक घटना घडली. पोलिस अधिकारी पान २ वर

### कुणाल कामरावरून विधानसभेतही पडसाद

स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्याचे पडसाद सोमवारी विधिमंडळात उमटले. विधानसभेत अर्जुन खोतकर यांनी हा मुद्दा उपस्थित करताना म्हटले, संविधानाने अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे. पण त्यात सांगितले आहे की काही बंधने पाळली पाहिजेत. या कामराने हिंदू देवीदेवतांचा अपमान केला. सर्वोच्च न्यायालयाबद्दल देखील अभद्र टिप्पणी करण्यापर्यंतची मजल गेली होती. त्याच्यावर दोन विमान कंपन्यांनी बंदी घातली होती. त्याच्या मुसक्या आवळल्या नाही तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू शकतो. यानंतर सत्ताधारी पक्षाचे सदस्य आक्रमक झाले. यामुळे कामकाज पाच मिनिटांकरिता विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी तहकूब केले.

### कुणाल कामराच्या वक्तव्याचे संसदेतही पडसाद

स्टँड अप कॉमेडियन कुणाल कामराने उपमुख्यमंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे मुख्य नेते एकनाथ शिंदेंबद्दल यांच्याबद्दल एक गाणे गायले. त्याचे पडसाद राजधानी दिल्लीत आणि संसदेच्या अधिवेशनातही उमटले. या प्रकरणावरून विरोधी पक्षाच्या खासदारांनी राज्य सरकारवर टीका केली तर सत्ताधारी पक्षाच्या खासदारांनी या वक्तव्याला चुकीचे असल्याचे म्हटले. बोलण्याचे स्वातंत्र्य आहे म्हणून काहीही बोलू नये, असेही सत्ताधारी खासदार म्हणाले.

## फहीमच्या घरावर कारवाईला स्टे; हायकोर्टाने प्रशासनाला फटकारले

**नागपूर । प्रतिनिधी**

नागपूर हिंसाचार प्रकरणातील मुख्य आरोपी फहीम खानच्या घराचे अतिक्रमण सोमवारी सकाळी महापालिका प्रशासनाने काढून टाकले. बुलडोझरने त्याच्या घरावर कारवाई करण्यात आली. याप्रकरणी महापालिकेकडून शुक्रवारी फहीम खानला नोटीस देण्यात आली होती. त्यानंतर सोमवारी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास महापालिकेचे अधिकारी बुलडोझरसह कारवाईसाठी दाखल झाले. सकाळी कारवाई केल्यानंतर दुपारी उच्च न्यायालयाकडून या कारवाईला स्थगिती देण्यात आली. तसेच या प्रकरणावरून प्रशासनावर नाराजीही व्यक्त केली आहे.

फहीम खानच्या आईने अतिक्रमण हटवण्याच्या कारवाईविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयाने ही कारवाई भेदभावातून झाल्याचे आणि एखाद्याला टार्गेट करण्याच्या हेतूने झाल्याचे निरीक्षण नोंदवले. या प्रकरणी पुढील कारवाईवर स्थगिती देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. राज्याच्या मुख्य पान २ वर

## शिवरायांचा अपमान करणारा प्रशांत कोरटकर पकडला

**मुंबई । प्रतिनिधी**



शिवरायांचा अपमान करणाऱ्या तसेच इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना धमकी देणाऱ्या प्रशांत कोरटकरला तेलंगणातून अटक झाल्याचे सांगण्यात येत आहे. गृहविभागातील सूत्रांनी याची माहिती दिली आहे. प्रशांत कोरटकरने अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. पण न्यायालयाने तो फेटाळला आहे.

इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना धमकी दिल्यानंतर प्रशांत कोरटकर हा २५ फेब्रुवारीपासून फरार होता. त्याने छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. नागपुरातून फरार झालेला कोरटकर हा चंद्रपूरमध्ये लपून बसला होता. कोल्हापूर पोलिस पान २ वर

## खोक्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी



**बीड । प्रतिनिधी**

**सतीश भोसले उर्फ खोक्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. खोक्याच्या जामिनासाठी वकिलाकडून अर्ज दाखल करण्यात आला होता. मात्र न्यायालयाने तो अर्ज फेटाळत त्याला १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. त्याची बीड जिल्हा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.**

खोक्या उर्फ सतीश भोसले याने तिघांना मारहाण केल्यावर त्याचे व्हिडिओ व्हायरल झाले होते. पान २ वर

## विजापूर चकमकीनंतर २२ कुख्यात नक्षलवाद्यांचे सरकारसमोर आत्मसमर्पण

**विजापूर। वृतसंस्था**

छत्तीसगड नक्षलमुक्त करण्यासाठी सरकार आणि सुरक्षा दल सतत प्रयत्न करत आहेत. राज्याच्या विविध भागात नक्षलवाद्यांशी सतत चकमकी सुरू आहेत आणि त्यांचा खात्मा केला जात आहे. त्याचवेळी, नक्षलवादी आता मोठ्या संख्येने आत्मसमर्पण करत आहेत. छत्तीसगडच्या विजापूर जिल्ह्यात २२ नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. आत्मसमर्पण करणाऱ्यांमध्ये दोन महिलांचाही समावेश आहे. जिल्ह्याचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक उलांडन यॉर्क यांनी दिलेल्या माहितीनुसार, आत्मसमर्पण केलेल्या सहा नक्षलवाद्यांवर एकूण ११ लाख रुपयांचे पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२४ मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: २७५.५० क्विंटल | २,२५० | ३,००० | २,५८४ |
| ज्वारी/हायब्रिड :२३९.५० क्विंटल | १,८०० | ३,२७० | २,४४६ |
| मका/लोकल:३०.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ३.०० क्विंटल | ७,००० | ७,००० | ७,००० |
| उडीद : ६.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ५५.०० क्विंटल | २,०५१ | २,९१३ | २,६४३ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ७३.०० क्विंटल | ३,५०० | ४,१०० | ३,९१० |
| हरभरा: ६६.५० क्विंटल | ५,१२५ | ६,००० | ५,२५० |

# पहिल्यांदाच एसटीत चांगला निर्णय; अधिकाऱ्यांच्या होणार बदल्या

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा आदेश; अधिकाऱ्यांची मनमानी थांबणार

**मुंबई । प्रतिनिधी**

**परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पुन्हा एकदा धडाकेबाज निर्णय घेतला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या आदेशामुळे एसटी महामंडळा कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. प्रताप सरनाईक यांनी अनेक अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश आहेत. ३ वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या होणार असून मुजोर अधिकाऱ्यांची मनमानी थांबणार आहे.**





### बदलीच नाही तर त्यांना घरी पाठवा

एसटी महामंडळात बरेच अधिकारी हे वेगवेगळ्या कारणामुळे चर्चेत असून एसटीच्या प्रगतीमध्ये असे अधिकारी मोठा अडथळा ठरत असल्याची चर्चा आहे. आता त्यांची बदलीच नाही तर त्यांना थेट घरी पाठवावे, अशी मागणी होत आहे.

एसटी महामंडळात गेल्या अनेक वर्षापासून बऱ्याच अधिकाऱ्यांची मनमानी सुरु आहे. वर्षानुवर्ष एकाच आगारात व कार्यालयात ठाण मांडून बसलेल्या अधिकाऱ्यांची आता बदली केली जाणार आहे. तीन वर्षांपेक्षा जास्त काळ एकाच मुख्यालयात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची बदली करा असे आदेश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. एसटी महामंडळात एकाच मुख्यालयात तीन वर्षापेक्षा जास्त पान २ वर

cmyk

अग्रलेख

# शैक्षणिक क्षेत्रात तरी गोंधळाचे वातावरण नको

येत्या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्रातील सर्व राज्य शिक्षण मंडळांमध्येही केंद्रीय पातळीवरील सीबीएसई हा अभ्यासक्रम लागू केला जाईल, अशी घोषणा राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केल्यानंतर या निर्णयाची अंमलबजावणी कशी होणार याबाबत उलट सुलट चर्चा सुरू झाली आहे. एकीकडे महाराष्ट्रात यावर्षीचे शैक्षणिक वर्ष एक एप्रिलपासून सुरू करावे अशा प्रकारचे नियोजन सुरू असताना एवढ्या कमी कालावधीमध्ये सीबीएसईचा अभ्यासक्रम महाराष्ट्रमध्ये लागू करणे शक्य आहे का, याचा विचार या निमित्ताने करावा लागणार आहे. अर्थात, मंत्री दादा भुसे यांनी खुलासा करताना फक्त पहिलीच्या वर्गासाठी या शैक्षणिक वर्षापासून सीबीएसई अभ्यासक्रम लागू केला जाईल आणि नंतर आगामी शैक्षणिक वर्षांमध्ये टप्प्याटप्प्याने सर्व इयत्तांसाठी हा केंद्रीय अभ्यासक्रम लागू केला जाईल, असे सांगितले आहे. एका बाजूने विचार करता महाराष्ट्रातील राज्य शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांची स्पर्धात्मकता वाढायची असेल तर त्यांना केंद्रीय पातळीवर ज्या प्रकारचे शिक्षण दिले जाते त्याच प्रकारचे शिक्षण देण्याची गरज आहे.

सीबीएसई म्हणजेच सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन हे जे शिक्षण मंडळ आहे ते देशातील २४ हजार पेक्षा जास्त शाळांमध्ये आपल्या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून शिक्षण देत असते. या सर्व शाळांमध्ये एकाच प्रकारची परीक्षा होत असते. साहजिकच विद्यार्थ्यांना वेगळ्या प्रकारचे गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते. दहावी आणि बारावीनंतर स्पर्धात्मक परीक्षांच्या वातावरणामध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश करावा लागतो त्याची मानसिकताही या शैक्षणिक वातावरणात तयार होते. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रासारख्या काही राज्यांमध्ये त्यांची राज्य शिक्षण मंडळे आहेत त्यांचा अभ्यासक्रम बर्यापैकी जरी केंद्रीय अभ्यासक्रमाप्रमाणे असला तरी स्पर्धात्मक वातावरणासाठी तो परिपूर्ण आहे, असे मानले जात नव्हते. म्हणूनच राज्य सरकारने निर्णय घेऊन केंद्रीय पातळीवरील अभ्यासक्रम राज्य शिक्षण मंडळांना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. अर्थात, निर्णय अमलात आणताना अनेक अडचणी येणार आहेत. कारण मुळात महाराष्ट्रात मराठी भाषेमध्ये शिक्षण दिले जाते आणि सीबीएसई मंडळाचे जे अभ्यासक्रम किंवा पाठ्यपुस्तके आहेत ती सर्व इंग्रजी माध्यमातून असल्यामुळे तो पाठ्यक्रम मराठी भाषेमध्ये भाषांतरित करण्याचे मोठे आव्हान पेलावे लागणार आहे. विविध अभ्यासक्रमांची इंग्रजी क्रमिक पुस्तके तत्काळ मराठीत भाषांतर करण्यासाठी राज्यातील सर्व विद्यापीठांनी वेगाने हालचाली कराव्यात असा आदेश उच्च शिक्षण विभागाने ऑगस्ट २०२३ मध्ये देऊनसुद्धा अडीच वर्षानंतरही पुस्तके भाषांतरित करण्याबाबत विद्यापीठे उदासीन असल्याची माहिती समोर येत आहे. विद्यापीठ पातळीवरच मराठीत पुस्तके भाषांतराबाबत अशी उदासीनता असताना शिक्षण मंडळाच्या पातळीवर सीबीएसई अभ्यासक्रमाची इंग्रजी पुस्तके मराठीत भाषांतर करून आणणे हे एक मोठे आव्हान ठरणार आहे. हा एक चांगला निर्णय असला तरी घाईघाईने त्याची अंमलबजावणी केल्यास काही तोटेही समोर येऊ शकतात.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे केंद्रीय पातळीवरील हा अभ्यासक्रम जसाच्या तसा स्वीकारताना राज्याचा इतिहास आणि भूगोल याबाबत केंद्रीय पातळीवरील अभ्यासक्रमामध्ये काही गोंधळाचे वातावरण असते. काही चुकीच्या गोष्टी सांगितल्या जात नाहीत ना हेसुद्धा पहावे लागणार आहे. सीबीएसई अभ्यासक्रमाची रचना एनसीईआरटी या संस्थेमार्फत केली जाते आणि अभ्यासक्रमाची रचना करताना एखादे विशिष्ट राज्य समोर न ठेवता संपूर्ण देशाचा विचार करून अभ्यासक्रमामध्ये कोणते विषय असावेत याचा निर्णय घेतला जातो. या धोरणाचा विचार करता अनेक वेळा आपल्या राज्याची किंवा आपल्या जिल्ह्याचीच भौगोलिक आणि ऐतिहासिक माहिती विद्यार्थ्यांना संपूर्ण प्रमाणात मिळेल की नाही याबाबतसुद्धा शंका निर्माण होते.

दहावी-बारावीनंतरच्या शैक्षणिक काळात विद्यार्थ्यांची स्पर्धात्मकता वाढावी आणि जेईई किंवा नीट यासारख्या परीक्षांना त्यांनी आत्मविश्वासाने सामोरे जावे म्हणून अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आला आहे. तरी या निर्णयाची अंमलबजावणी किती विश्वासाने आणि गांभीर्याने होते हेसुद्धा महत्त्वाचे ठरणार आहे. या शैक्षणिक वर्षापासून फक्त पहिलीसाठी केंद्रीय पातळीवरील अभ्यासक्रम लागू करण्याचा मार्ग आता सरकारने काढला असला तरी त्याची अंमलबजावणी झाल्यानंतर त्याचे फायदे आणि तोटेसुद्धा समोर येणार आहेत.

# मच्छिंद्रनाथ देवस्थानच्या संजीवन समाधी महोत्सवाचे २९ आणि ३० मार्च रोजी आयोजन




**आष्टी । प्रतिनिधी**

**बीड, नगरसह महाराष्ट्रातील अनेक भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या आष्टी तालुक्यातील सावरगाव नजीकच्या मच्छिंद्रनाथ देवस्थान ( मायंबा ) समाधी महोत्सवाचे २९ आणि ३० मार्च रोजी आयोजन करण्यात आले आहे.**

गर्भगिरीच्या पर्वत रांगेतील आष्टी आणि पाथर्डी तालुक्याच्या हद्दीवर मच्छिंद्रनाथ मायंबा हे देवस्थान आहे. या ठिकाणी राज्यभरातून भाविक दर्शनासाठी येत असतात. दरवर्षी गुढीपाडव्याला येथे मोठी यात्रा भरते . त्याच्या आधी संजीवन समाधी महोत्सवामध्ये विविध उपक्रमास सुरुवात होते. यावर्षी मंगळवार दिनांक २५ मार्चपासून हा महोत्सव सुरू होत असून या दिवशी निशाण दिंडीचे मच्छिंद्रनाथ गडाहून पैठण कडे प्रस्थान होईल . २९ मार्च रोजी पैठण येथे निशान मिरवणूक होईल. तेथून कावडीसह गडाकडे भाविक प्रस्थान करतील . २९ मार्च रोजी निशान आणि कावडीचे मच्छिंद्रगड येथे आगमन होईल.आधी महाआरती होईल त्यानंतर दुपारी दीड ते सायंकाळी चार या वेळेत विविध ठिकाणाहून कावडीने आणलेल्या गंगाजलाने समाधीस अभिषेक केला जाईल . सायंकाळी चार ते पहाटे साडेपाच या वेळेत समाधीस उटणे, चंदन लेप लावणे हा कार्यक्रम पार पडेल. मागील वर्षी मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने रात्री बारा ऐवजी हा चंदन लेप लावण्याचा कार्यक्रमाची वेळ सायंकाळी चार पासून वाढवण्यात आली आहे . त्यानंतर रविवार दिनांक ३० मार्च रोजी पहाटे साडेपाच वाजता समाधीची विधीवत महापूजा केले जाईल त्यानंतर आरती होईल आणि नियमित दर्शन सुरू होईल अशी माहिती मच्छिंद्रनाथ देवस्थानच्या वतीने देण्यात आली आहे.

> आष्टी तालुक्यातील सावरगाव येथे संपूर्ण जगामध्ये एकमेव अशी मच्छिंद्रनाथांची एकमेव संजीवन समाधी असून गेल्यावर्षी दर्शन रांगेमध्ये प्रचंड अडचणी आल्या होत्या.काही त्रुटी राहिल्या होत्या .त्या त्रुटी यावर्षी आम्ही सर्व सुधारल्या आहेत.आजपर्यंत सायंकाळी सात वाजता समाधी उघडी करून दर्शन सुरू होत होते मात्र यावर्षी सकाळी दहा वाजता कावडी येतील .दुपारी साडेबारा वाजता आरती होईल .एक वाजेपर्यंत उटणे काढणे कार्यक्रम .दुपारी एक ते चार कावडीने आणलेले पाणी घालणे.व चार वाजता उटणे (लेप)लावणे कार्यक्रम सुरू होणार असून दुसऱ्या दिवशी पहाटे पाच वाजेपर्यंत समाधी दर्शन सुरू राहील हा बदल वाढत्या गर्दीमुळे करण्यात आला आहे.
>
> **आ.सुरेश धस, आष्टी विधानसभा**

## मा.आ.लक्ष्मण पवार व शिवराज पवारांच्या वतिने आयोजित इफ्तार पार्टीस उत्स्फूर्त प्रतिसाद

**गेवराई । प्रतिनिधी**

**भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांच्या वतीने सोमवार ता. २४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या रोजा इफ्तार पार्टीस मुस्लिम बांधवांनी उपस्थिती दर्शवून मोठा प्रतिसाद दिला. यावेळी युवा नेते शिवराज दादा पवार यांनी आलेल्या मुस्लिम बांधवांचे स्वागत केले.**

गेवराई शहरातील छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल सभागृहात भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांच्या वतीने प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

युवा नेते शिवराज पवार यांनी आलेल्या



सर्व मुस्लिम बांधवांचे स्वागत केले.

पवित्र रमजान महिण्यानिमित्त मुस्लिम बांधव दिवसभर उपवास पाळतात. सायंकाळी उपवास सोडण्यात येतो. भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात येते. सोमवार ता. २४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या इफ्तार पार्टीस गेवराई शहरातील मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली यावेळी शहरातील मुस्लिम बांधवासह शहरातील प्रतिष्ठित नागरिक व पत्रकार बांधव तसेच पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## ओबीसींची उत्पन्न मर्यादा वाढवण्यास केंद्राचा नकार

### आ.राजेश राठोड यांनी मांडली होती लक्षवेधी

**जालना । प्रतिनिधी**

ओबीसींची उत्पन्न मर्यादा वाढवण्याचा तुर्तास कुठलाही प्रस्ताव नसल्याचे केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री डॉ. विरेंद्रकुमार यांनी राज्यसभेत दोन दिवसापूर्वी जाहीर के ल्यामुळे नानकि लियेर मुद्यावरून अक्षरक्षः तोंडघशी पडले आहे. राज्य सरकारकडून नॉन क्रिमिलयिरची मर्यादा १५ लाख रूपयांपर्यंत वाढवण्यासाठी केंद्र रून महाराष्ट्र सरकार सरकारकडे शिफारस करण्यात आल्याची माहीती इतर मागास बहुजन कल्याणमंत्री श्री. अतुल सावे यांनी नुकतीच विधान परिषदेत दिली होती. राष्ट्रीय आबीसी महासंघासह विविध संघटनांकडून नॉन क्रिमिलियरची मर्यादा वाढवण्याची मागणी वारंवार करण्यात आली होती. यासाठी अनेक आंदोलनेही झाली.



जालन्याचे विधान परिषद सदस्य श्री. राजेश राठोड यांनी यासंदर्भात मांडलेल्या लक्षवेधीला श्री. अतुल सावे यांनी उत्तर देतांना सांगितले की, शिंदे सरकारच्या मंत्रीमंडळाने क्रिमिलियरची मर्यादा वाढवण्याचा निर्णय घेतला होता. आता मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात केंद्राकडे या संदर्भात शिफारस केलेली आहे. परंतु केंद्रीय सामाजिक न्याय मंत्र्यांनी राज्यसभेत ओबीसींची उत्पन्न मर्यादा वाढवण्यास तुर्तास नकार दिल्यामुळे महाराष्ट्र सरकारची पंचायत झाली आहे. विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीर राज्य सरकारने यासंदर्भातील निर्णय घेतला आणि नॉन क्रिमिलियरची मर्यादा वाढवल्यानंतर ओबीसी, मराठा आणि इतर समाजातील आरक्षणाचा लाभघेणाऱ्यांना याचा फायदा होईल. नॉन क्रिमिलियरची मर्यादा १५ लाख रूपयांची मर्यादा केल्यास वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांनाही फायदा होईल असे सांगितले जात होते.

# मृत्यू नोंदणी बाबत नवीन नियमावली जाहीर

**जालना । प्रतिनिधी**

**नवीन जन्ममृत्यू नोंदणी बाबत नवीन नियम वाली जाहीर करण्यात आली. नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम अंतर्गत १३ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे.त्यानुसार, ज्या जन्म व मृत्यूच्या नोंदणीबाबत एक वर्षापेक्षा अधिक कालावधीने सूचना प्राप्त होते, अशा प्रकरणात नोंदी घेण्यासाठी जिल्हा दंडाधिकारी किंवा उप विभागीय दंडाधिकारी किंवा कार्यकारी दंडाधिकारी, ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केले आहे, अशा कार्यक्षेत्रासाठी ज्या ठिकाणी अशा व्यक्तीचा जन्म व मृत्यू झाला आहे, त्याबाबतच्या अचूकतेबाबत खात्री करुन विलंब शुल्क आकारुन अशा नोंदी घेण्याबाबत आदेशित करण्याची सुधारीत तरतूद करण्यात आली आहे.**

काही परकीय नागरिकांकडून विलंबाने जन्म नोंदी करुन घेतल्या जात असल्याबाबतच्या तक्रारी शासनाच्या निदर्शनास आल्या आहेत. अशा प्रकरणांना वेळीच प्रतिबंध करण्यासाठी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील तरतूदीनुसार तसेच महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम, २००० नुसार एका वर्षापेक्षा जास्त विलंबाच्या जन्म-मृत्यू नोंदी घेण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम, २००० मधील नियम १३ (३) नुसार जन्म व मृत्यू घटना नोंदणी संदर्भातील निबंधक, जन्म व मृत्यू यांनी अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार आता जन्म व मृत्यू नोंदणीसंदर्भात निबंधक तसेच जिल्हा दंडाधिकारी किंवा उप विभागीय दंडाधिकारी किंवा कार्यकारी दंडाधिकारी, ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी ९ पैकी २ तपासणी करावी जन्म-मृत्यू नोंद नसल्याचे अनुपलब्धता प्रमाणपत्र देतांना निबंधकाने अनुसरावयाची निबंधकाच्या कार्यक्षेत्रात नागरीकांच्या जन्म-मृत्यूबाबतची घटना घडली असल्यास त्याबाबतचा सबळ पुरावा शव विच्छेदन अहवाल, प्रथम खबरी अहवाल, जन्म घरी झाल्यास अंगणवाडी सेविका व तत्सम अन्य कर्मचारी यांचे जवाब/प्रतिज्ञापत्र, रुग्णालयीन नोंदीचे कागदपत्र, अन्य शासकीय अभिलेखे इ.) प्राप्त करुन तसेच त्याबाबतची खात्री करुनच जन्म मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे. जन्म मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्राकरीता किंवा जन्म मृत्यूची नोंद घेण्यास १ वर्षापेक्षा जास्त उशीर झालेला आहे अशा प्रकरणी प्राप्त मागणी अर्जासोबत ज्यांची जन्म-मृत्यूची नोंद घ्यावयाची आहे त्यांचे रुग्णालयाचे प्रमाणपत्र, आरोग्य विषयक नोंदीचे पुरावे लसीकरण, शाळा प्रवेश-निर्गम उतारा इ.) त्यांच्या आई-वडील, रक्ताच्या नातेवाईकांचे अधिवास प्रमाणपत्र, जन्म प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, जमीन उतारा, खरेदी खत, कर पावती, आधार कार्ड, पॅन कार्ड अन्य शासकीय ओळखपत्र इत्यादी पुराव्यांचा विचार करुन तसेच अर्जदाराची वंशावळ आणि त्यांची ओळख पटविणारे शासकीय अभिलेखे तसेच रहिवासाबाबतचे शासकीय पुस ९ पैकी शासन निर्णय क्रमांकः जमृनों-२५२५/प्र.क्र.२२(ई.ऑ.९९११८१) वीज पावती, कर पावती इ.) यावरुन सत्यता पटवूनच खात्री झाल्यानंतर जन्म -मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे. अर्जदार स्थानिक रहिवाशी असल्याची पडताळणी करुनच निबंधकाने जन्म मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र द्यावे. अन्यथा स्थानिक रहिवाशी नसेल तर जन्म मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात येऊ नये. याकरीता स्थानिक चौकशी / पंचनामा करुन खात्री करावी. विलंबाने जन्म-मृत्यू नोंदीबाबत कारणमिमांसेसह पडताळणी करावी. तसेच एकाच कुटुंबातील अनेक सदस्य एकाच वेळी नोंदी घेण्याबाबत अर्ज सादर करीत असतील अशावेळी अधिक सखोल चौकशी करण्यात यावी. जन्म-मृत्यूच्या विलंबाने नोंदीबाबत पुरावे उपलब्ध झाल्यास आणि पडताळणी व खात्री झाल्यानंतरच निबंधकाने अनुपलब्धता प्रमाणपत्र अर्जदारास द्यावे तसेच याबाबत आदेशास्तव संपूर्ण प्रस्तावाची एक प्रत स्वयंस्पष्ट अभिप्रायासह जिल्हा दंडाधिकारी / उप विभागीय दंडाधिकारी / तालुका दंडाधिकारी / ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केले आहे त्यांना सादर करावी. तसेच ज्या प्रकरणी सबळ पुरावे उपलब्ध होत नाहीत, खोटे/बनावट पुरावे प्राप्त झाल्याचे निदर्शनास आल्यावर अशा प्रकरणांची माहिती तात्काळ पोलीस विभागास माहिती देण्यात यावी. जन्म मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्राच्या आधारे पारीत करावयाच्या आदेशाबाबत जिल्हा दंडाधिकारी, उप विभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी, ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केले आहे त्यांनी अनुसरावयाची कार्यपध्दत अर्जदाराकडून प्राप्त अर्ज व निबंधकाद्वारे प्राप्त प्रस्तावानुसार जिल्हा दंडाधिकारी, उप विभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केले आहे, त्यांनी १५ दिवसांचे जाहीर प्रगटन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयामध्ये, कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय, संबंधित जन्म मृत्यु निबंधक यांचे कार्यालय इ. कार्यालये तसेच, स्थानिक वृत्तपत्रामध्ये अर्जदाराच्या खर्चाने प्रसिध्द करावे.(ब) मृत्यूच्या अनुषंगाने (जसे शव विच्छेदन अहवाल, प्रथम खबरी अहवाल, रुग्णालयीन कागदपत्रे, इ.) (क) शैक्षणिक पुरावे (जसेः शाळेच्या प्रवेश-निर्गम रजिस्टरचा उतारा, बोनाफाईड प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला इ.), (ङ) रहिवासाचे पुरावे (जसे मालमत्ता कराची पावती, पाणीपट्टी, विज बील इ.). (इ) मालमत्तेचे पुरावे (जसेः सातबारा उतारा, नमुना ८-अ चा उतारा, वारस नोंदीचे फेरफार, मिळकत उतारा, नोंदणीकृत दस्त अशी नियमावली असल्याची माहिती अंबड तहसील कार्यालयातील श्री मिसाळ व श्री संत्रे यांनी दिली आहे.

## पान १ वरून...

### अजून किती शेतकऱ्यांच्या

केली. केंद्र सरकारने २० टक्के कांदा निर्यातशुल्क हटवल्याबद्दल राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत अभिनंदन प्रस्ताव मांडला. केंद्र सरकार आणि केंद्रीय मंत्री अमित शाह यांचे अभिनंदन केले. यावरून काँग्रेसचे आमदार नाना पटोले आणि विजय वडेट्टीवार यांनी सवाल उपस्थित केला. केंद्र सरकारच्या निर्यात शुल्क लावण्याच्या निर्णयाने व्हायचे ते नुकसान कांदा उत्पादकांचे झाले. केंद्र सरकारने निर्यात शुल्क लावण्याचा निर्णय घेतला त्यावेळी सत्ताधाऱ्यांनी केंद्र सरकारच्या विरोधात निवेदन का केले नाही. आता मात्र अभिनंदन केले जात आहे. परंतु शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे वडेट्टीवार म्हणाले.

---------

### स्टॅंड अप कॉमेडियन कुणाल कामरा

उपस्थित असताना एका स्टुडिओवर काही लोकांनी हल्ला केला. मंगळवार, बुधवारी आपण राज्यघटनेवर चर्चा करणार आहोत. चर्चा करताना नागरिकांचे मूलभूत अधिकार, नागरिकांचे कर्तव्य आदी विषयांवरही चर्चा करणार आहोत. असे असताना कुणाल कामराने विडंबन कविता सादर केली. कॉमेडियन अशी कविता सादर करत असतात, पण सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी तोडफोड केली. या कार्यकर्त्यांनी सोलापूरकर, कोरटकर यांच्यावर काही भाष्य केले नसल्याचे सांगत सभागृहात एकच गदारोळ सुरु झाला. या गोंधळातच अंबादास दानवे पुढे बोलताना म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणारे लोक कोरटकर, सोलापूरकर आहेत, तरीही कॉमेडियनचा निषेध नोंदविला जातो. पोलिसांच्या उपस्थितीत तोडफोड केली जाते. राज्याचे मुख्यमंत्री म्हणतात कॉमेडियनने माफी मागितली पाहिजे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार हिसकावून घेत आहे का, सत्ताधारी पक्षाचेच लोक अशा पद्धतीने तोडफोड करत असतात का असा सवाल करत राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी कारवाई केली पाहिजे, अशी मागणी केली. तसेच कोरटकर, सोलापूरकर बाबत हे शांत का बसले असा सवालही यावेळी करत मला वाटते कायदा व सुव्यवस्था सत्ताधारी पक्ष बिघडवत आहे, तोडफोड करणाऱ्या सगळ्यांनाच अटक झाली पाहिजे अशी मागणीही यावेळी त्यांनी केली. अंबादास दानवे यांच्या या वक्तव्यानंतर उदय सामंत म्हणाले की, कुणाल कामरा भारत जोडो यात्रेत होता, तसेच हा विषय एकट्या एकनाथ शिंदे यांच्यापुरता मर्यादीत नाही. त्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत जी वाक्ये बोलली आहेत ती इथे सांगण्यासारखी नाहीत. मराठी भाषेचा मंत्री इथे उपस्थित आहे, अशा भाषेचे समर्थन कोणी करू नये असे सांगत एकनाथ शिंदे यांचा सत्कार महाराष्ट्राची संस्कृती जपली म्हणून वारकरी बांधवानी केला होता, त्यांच्याबाबत कुणाल कामरा बोलला, आनंद महिंद्रा, मुकेश अंबानी बाबत बोलला आपण त्याचे समर्थन करता कामा नये असेही यावेळी सामंत म्हणाले.

----------

### शिवरायांचा अपमान करणारा

त्याला अटक करण्यासाठी गेले असता त्या ठिकाणाहूनही तो फरार झाला होता. प्रशांत कोरटकरला आता एका महिन्यानंतर तेलंगणामधून अटक केली आहे. त्या ठिकाणी नोंद केल्यानंतर कोल्हापूर पोलिस त्याला ताब्यात घेतील. इंद्रजीत सावंत यांनी कोरटकर विरोधात कोल्हापुरातील जुना राजवाडा पोलिस ठाण्यात तक्रार नोंद केली होती. त्यामुळे कोरटकरला आता कोल्हापूरला आणण्यात येणार आहे. दरम्यान, प्रशांत कोरटकरचा अंतरिम जामीन उच्च न्यायालय फेटाळणार असल्याची जाणीव झाल्यानंतर त्याच्यासमोर कोणताही पर्याय शिल्लक राहिला नाही. त्यामुळे त्याला पोलिसांसमोर शरण येण्याशिवाय कोणताही पर्यात नव्हता. त्याचमुळे आता पोलिसांनी त्याला अटक केल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून केला जात आहे.

-------------

### फहीमच्या घरावर कारवाईला स्टे;

सचिवांना सर्वोच्च आदेशाची अवहेलना केल्या प्रकरणी जबाब नोंदवण्यास सांगितले आहे. नागपूरमध्ये झालेल्या दंगल प्रकरणातील सूत्रधार असल्याचा आरोप असणाऱ्या फहिम खानच्या घरावर नागपूर महापालिका प्रशासनाने कारवाई केली. घराचे अतिक्रमण हटवण्याची कारवाई सोमवारी सकाळी दहा वाजता सुरू करण्यात आले. संजय बाग कॉलनीत दोन मजली इमारतीचे अनधिकृत बांधकाम हटवण्याचे काम सुरू केले होते. अनधिकृत बांधकाम काढून घेण्यासाठी २४ तासांची मुदत प्रशासनाने नोटीस बजावून दिली होती. त्यानंतर वीज तोडण्यात आली आणि बुलडोझरने अनधिकृत बांधकाम तोडले गेले.

**सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचा अवमान**

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा अवमान केल्या प्रकरणी उच्च न्यायालयाने राज्याच्या मुख्य सचिवांना उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत. एखाद्या गुन्ह्यात व्यक्ती आरोपी आहे म्हणून त्याच्या मालमत्तेवर बुलडोझर चालवणे आणि कारवाई करणे हे घटनाविरोधी असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. पण सोमवारी नागपूर हिंसाचार प्रकरणातील मुख्य आरोपी फहीम खानच्या घरावर बुलडोझरने कारवाई केली गेली. ही कारवाई घटनाविरोधी ठरवून संबंधित अधिकाऱ्याला दोषी धरावे असेही उच्च न्यायालयाने म्हटले आहे.

--------------

### विजापूर चकमकीनंतर २२ कुख्यात .

बक्षीस जाहीर होते. छत्तीसगड सरकारच्या पुनर्वसन धोरणाअंतर्गत या सर्व नक्षलवाद्यांना प्रत्येकी २५,००० रुपयांची रोख मदत देण्यात आली आहे.

-------------

### खोक्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

त्यानंतर त्याच्यावर वेगवेगळे गुन्हे दाखल होत त्याला प्रयागराज येथून अटक करण्यात आली. त्याचे शिश महलही जमीनदोस्त करण्यात आल्यावर काही लोकांनी ते जाळून देखील टाकले होते. खोक्याला न्यायालयासमोर हजर केले असता त्यास १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. सध्या त्याची बीड जिल्हा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

-----------

### पहिल्यांदाच एसटीत चांगला निर्णय;

काळ ठाण मांडून बसलेल्या अधिकाऱ्यांची तातडीने इतर ठिकाणी बदली करा असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले आहेत. त्यामुळे वर्षानुवर्ष एकाच मुख्यालयात राहून मनमानी करणाऱ्या अधिकाऱ्यांना हा मोठा दणका आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि. २५ मार्च २०२५



## बीड तालुक्यातील सरपंच पदासाठी आज सोडत

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील ग्रामपंचायत मध्ये सरपंच पदासाठी आज दिनांक २५ मार्च रोजी सकाळी ११ वाजता तालुक्यातील १७५ ग्रामपंचायतीच्या सरपंच आरक्षणाची सौडत तहसील कार्यालय येथे होणार आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत निवडणूक नियम १९६४ च्या नियम तीन (अ) प्रमाणे तालुका निहाय गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतीसाठी आरक्षण करून संख्या निश्चित करण्यात आली आहे. सरपंच पदासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग, खुला प्रवर्ग व सर्व प्रवर्गातील महिला आरक्षण सोडत आज दिनांक २५ मार्च रोजी सकाळी ११ वाजता बीड तहसीलमध्ये होणार आहे. ही सौडत १७५ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठी होणार आहे . ही प्रक्रिया उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या नियंत्रणाखाली होणार असून तालुक्यातील १७५ ग्रामपंचायत स्तरावरील नागरिकांनी या सरपंच पदाच्या आरक्षण समिती उपस्थित राहण्याचे आवाहन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले आहे.

## अंशत: अनुदानित शाळांना टप्पा वाढ मागणीसाठी आझाद मैदानात महिला शिक्षकांचा आत्मदहनाचा प्रयत्न

### पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे अनर्थ टळला





**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील अंशत: अनुदानित शाळांना वाढीव अनुदानाच्या टप्प्यासाठी निधीची तरतूद करा या मागणीसाठी राज्यातील शिक्षकांनी आझाद मैदानावर आंदोलन सुरू केले. परंतु आपल्या हक्काच्या वेतनासाठी सातत्याने आंदोलन करून ही सरकारला कसलीच जाग येत नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या महिला शिक्षिकांनी अंगावर रॉकेल ओतून घेत स्वत:ला जाळून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. या घटनेने आझाद मैदान परिसरात एकच खळबळ उडाली.**

राज्यातील अंशत: अनुदानित, विनाअनुदानित त्रुटी पूर्तता केलेल्या शाळा व मूल्यांकनास पात्र असलेल्या शाळांचे सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आझाद मैदानावर आपल्या न्याय हक्कासाठी आंदोलन करीत आहेत. परंतु सातत्याने आंदोलन करून आपल्या हक्काच्या मागण्या शासनापुढे मांडून देखील शासन आपल्या मागण्या पूर्ण करत नाहीत. आम्ही सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असतानाही सरकार आमच्या मागण्याबद्दल सहानुभूतीपूर्वक विचार करत नाही त्यामुळे आझाद मैदानात आंदोलन करणाऱ्या शिक्षकवृंदात संतापाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी तीव्र संतापलेल्या गावंडे मॅडम आणि साळवी मॅडम या दोन्ही मॅडम दोन महिला शिक्षिकांनी काल दिनांक २४ मार्च २०२५ रोजी दुपारी ३:०० वाजण्याच्या सुमारास आझाद मैदानात स्वत:च्या अंगावरती रॉकेल ओतून स्वत:ला जाळून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला. या घटनेने आझाद मैदान परिसरात एकच खळबळ उडाली. दरम्यान सदर घटनेची माहिती मिळताच शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांना मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत सर्व प्रकारची माहिती घेतली. यावेळी जीवाचं बरं वाईट करू नका किंवा आत्मदहना सारख्या मार्ग अवलंबून आपलं जीवन संपवू नका. शांततेच्या मार्गाने आपल्या मागण्या सरकारकडे मांडू. सरकार निश्चितच आपल्या मागण्या पूर्ण करेल असा विश्वास यावेळी शिक्षक आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी व्यक्त करत कोणत्याही शिक्षकांनी चुकीचं पाऊल उचलू नये असे आवाहन आंदोलनकर्त्यां शिक्षकांना केले.

## मस्साजोग येथील नदी खोलीकरणाच्या कामाने घेतला वेग

### -ॲड. अजित देशमुख यांनी केली पाहणी



बीड । प्रतिनिधी

मस्साजोग तालुका केज येथील नदी खोलीकरणाच्या कामाने वेग घेतला आहे. नाम फाउंडेशन मार्फत हे काम चालू आहे. गेल्या काही दिवसात चांगल्या पद्धतीने काम होत आहे. या कामाची पाहणी जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित देशमुख आणि नामचे समन्वयक राजाभाऊ शेळके यांनी केली.

नदी खोलीकरणाचा हा प्रकल्प योग्य वेळेत सुरू झाल्यामुळे पावसाळ्यापूर्वी खूप मोठे काम करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. शेतकऱ्यांनी देखील या कामाकडे लक्ष वेधले आहे. त्यामुळे कामाने चांगली गती घेतली असून कामाकडे लक्ष देण्यासाठी सक्षम कार्यकर्त्याची नियुक्ती देखील करण्यात आली आहे.

रविवारी या कामाची पाहणी करण्यासाठी ॲड. अजित देशमुख यांच्यासह राजाभाऊ शेळके, भागवत कदम, तुषार देशमुख, मंगेश देशमुख, मनोज देशमुख, बाळासाहेब देशमुख यांच्यासह अन्य शेतकऱ्यांनी भाग घेतला. चांगल्या पद्धतीने काम होत असल्याने सर्वांनी समाधान व्यक्त केले. यानंतर धनंजय देशमुख यांच्या बरोबरही चर्चा करण्यात आली.

या नदीतील गाळ निघतो तेवढा काढल्यानंतर मोठे खड्डे होतील आणि त्यात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा होईल. त्यातून गाव विकासाला चालना मिळेल त्यामुळे शेतकऱ्यांसह सर्व गावकऱ्यांनी या कामाकडे लक्ष द्यावे, असे आवाहन देखील शेळके आणि ॲड. देशमुख यांनी केले आहे.



बीड : भगवान महावीर जन्म कल्याण समितीच्या स्वागताध्यक्षपदी जेष्ठ समाजसेवक तथा समाजभुषण मा.नितीनचंद्रजी कोटेचा यांची निवड झाल्याबद्दल हार्दिक शुभेच्छा देतांना सुहास पाटील, सुशांत सत्राळकर.

## जात्यावरच्या ओव्यांना उजाळा देणारी बहिणाबाई-प्राचार्य व्यंकट अनिगुंठे

कळंब । प्रतिनिधी

जात्यावरील ओव्यांना उजाळा देणारी दुसरी बहिणाबाईच होऊन गेली, असे गौरव उद्गार प्राचार्य अनिगुंठे यांनी केले.

कळंब येथे पर्याय संस्थेच्या कै.मधुकर बिबवे सांस्कृतिक सभागृहांमध्ये कै. सरूबाई डोके यांच्या जात्यावरील ओव्या तर भूमिपुत्र वाघ यांची आभाळमाया या काव्यसंग्रहाचे प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी विचार पिठावरून प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष विश्वनाथ अण्णा तोडकर तर प्रमुख पाहुणे म्हणून एम एन कोंडाळकर, रमाकांत कुलकर्णी, प्रोफेसर बाळकृष्ण भवर, प्राचार्य गोविंद बिराजदार, शिवानंद दळगडे हे विचारपीठावरती उपस्थित होते.

महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रकाशन सोहळ्यास सुरुवात करण्यात आली. त्यानंतर सातेफळ येथील चिमुकली राधा डोके हिने स्वागत गीत गाऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली. नात्यागोत्याची, माहेरच्या मातीची विन गुंफत अंतर्मनाला मंत्रमुग्ध करणारी भाव भावनांचा अंतर्मनाचा वेध घेणारी अशी ही बहिणाबाई धाराशिव जिल्ह्यामध्ये सातेफळ या ठिकाणी अशिक्षित असूनही प्रतिभा संपन्न असणारी कवित्री होऊन गेली.बहिणीच्या मृत्यूनंतर भूमिपुत्र वाघ यांनी जात्यावरील ओव्याचं प्रकाशन करण्याचं मोठं कार्य हाती घेऊन तिच्या विचाराला उजळा दिला. प्रकाशन सोहळ्याच्या या



शुभप्रसंगी विचार पिठावरती रमाकांत कुलकर्णी, डॉक्टर बाळकृष्ण भवर, प्राचार्य गोविंद बिराजदार यांनी आभाळमाया आणि जातीवरील ओव्या या काव्यावरती आपले विवेचन केले. प्रकाशन सोहळ्याचे अध्यक्ष माननीय विश्वनाथ तोडकर (अण्णा) यांनी भूमिपुत्र वाघ यांच्या कथा, कविता,चित्रपट निर्मिती, लेखक,दिग्दर्शक, बहु आयामी,ममत्व, प्रेमळ स्वभाव असणाऱ्या भूमिपुत्र वाघ यांच्या कार्याचा आढावा घेतला. बहिणीच्या प्रती असलेल्या प्रेमाला उजाळा देण्याचे कार्य त्यांनी केलं. कुटुंब, नातीगोती, भाऊ, बहिणीचा प्रेम,जिव्हाळा आपुलकी अशा सर्व सांगोपांग विचाराला त्यांनी उजाळा देण्याचं कार्य केलं. बुडत चालेली लोककला ही पुन्हा प्रज्वलित करण्याचं मोठं काम भूमीपुत्र वाघ यांनी केलं. बहिणीने तयार करून ठेवलेल्या ओव्यांना पुन्हा समाजासमोर ठेवण्याचं कार्य त्यांच्या हातातून झालं. याबद्दल आम्ही धन्य झालो. ओव्याच्या प्रकाशन संदर्भात त्यांनी कौतुकही केले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते आभाळमाया आणि जात्यावरील ओव्या याचे प्रकाशन करण्यात आले. हे सर्व कार्य करण्यासाठी सौभाग्यवती विजया वाघ यांचा मोलाचा वाटा असल्याचे तोडकर अण्णा यांनी विचार मांडले.. या कार्यक्रमाला महाराष्ट्रातून विविध क्षेत्रातील मान्यवर, प्राध्यापक, शिक्षक, समाजसेवक, समाजसेविका कथाकार, कवि असे विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. प्रकाशनानंतर कवीचे संमेलन आयोजित केले. या कार्यक्रमाला मॉर्निंग वॉक उमरगा येथील विविध क्षेत्रातील विशेष मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव गपाट यांनी केले तर आभार भूमिपुत्र वाघ यांनी मानले. कळंब,भूम,परंडा तालुक्यातील विविध क्षेत्रातील कवींनी यात सहभाग नोंदविला.

## गावों-गावी व्यापारी संघटना उभारणीचे श्रेय बंब यांनाच -सतिष पंच

**जालना । प्रतिनिधी**

जनरल मर्चन्टस्? असोसिएशन जिल्हा जालना च्या प्रमुख पदाधिकार्यांची बैठक अध्यक्ष हस्तीमलजी बंब यांच्या अध्यक्षते खाली हॉटेल सात्विक भोज च्या कार्यालयात दि. २३ मार्च २०२५ रविवार रोजी घेण्यात आली. बैठकीचे प्रास्ताविक करताना श्री हस्तीमलजी बंब म्हणाले जिल्ह्यातील जनरल मर्चन्ट, उद्योजक, व्यवसायकांची लवकरच जिल्हा दिशा - निर्देशिका प्रकाशीत करण्यात येईल अशी माहिती दिली. या वेळी बंब सोबत व्यापारी महासंघाचे राज्य उपाध्यक्ष सतीष पंच, मराठवाडा विभागाचे सचिव सुखदेव बजाज, जिल्हा सचिव संदीप काबरा मंचावर उपस्थित होते. पुढे बोलताना बंब म्हणाले आमची संघटना जिल्ह्यात फार जुनी व मोठी संघटना आहे. संस्थेला ५० वर्ष पुर्ण झाल्याने मागील दिवसात सुवर्ण महोत्सव सुध्दा आयोजित करण्यात



आले होते. संपुर्ण जिल्ह्यात, सर्व तालुक्यात व ग्रामीण भागात व्यापार्यांची संघटना उभारण्यात आलेली आहे. आपल्या संस्थेला धर्मदाय आयुक्त कार्यालयात नोंदणी करून रजिस्टर्ड करण्यात आलेले आहे. म्हणजे आपल्याला शासकीय मान्यता प्राप्त आहे. आता दहा वर्षा नंतर परत जिल्ह्याची जनगणना करण्यात आलेली आहे. यात जनवरी माह पासून जालना शहरातील सर्व तालुका आणि ग्रामीण भागाची प्रत्येक प्रतिष्ठाणाची, त्यांच्या व्यवसायाचा स्वरुप, पत्ता, मोबाईल नंबर इ. माहिती संकलन करण्यात आलेली आहे. लवकरच जिल्हा निर्देशिका प्रकाशित करु. त्यामुळे व्यापार्यांना आपसात संपर्क होणे सोपे होईल. दिशा निर्देशिका म्हणजे संपुर्ण व्यापार्यांना एका मोतीच्या माळेत गठण करण्याचे व व्यापार्यांना एकजुट करण्याचे माध्यम आहे, असे बंब म्हणाले. सचिव संदीप काबरा यांनी मागील बैठकीचे वृतांत सादर केले. कोषाध्यक्ष सुदर्शन चिप्पा यांनी आवक-जावक हिसोब सादर केला. श्री पंच मार्गदर्शन करताना जिल्ह्यात बंब यांच्या नेतृत्वाखाली व्यापारी महासंघात महिलाना आरक्षण देऊन प्रत्येक गावात महिला आघाडी उभारणी, प्रत्येक व्यापार्यांना संघटनेचे प्रमाणपत्र, ग्रामीण भागातील लहान-सहान व्यापार्यांना त्यांच्या सुरक्षेसाठी प्रत्येकांना एक लाख रुपयाचे अपघाती विमा देण्यात आले आहे. जिल्ह्यात सर्व तालुक्यात जवळपास ५० गावात व्यापारी संघटनेची शाखा उघडणारा फक्त महाराष्ट्रात नाही तर संपुर्ण देशात एकमेव जालना जिल्हा आहे. बंब मुळेच जालना जिल्ह्याला राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेला आहे. गावो-गावी व्यापारी संघटना उभारणीचे श्रेय बंब यांनाच आहे, असे पंच म्हणाले. श्री बजाज यांनी ही आपले विचार मांडले. या बैठकीसाठी जगदीश अग्रवाल, दुर्गाप्रसाद लड्ढा, शिवाजी तनपुरे, मो. कासीम बावला आदिंनी परिश्रम घेतले. श्री सुभाष सोनुने यांनी निर्देशिकाचे प्रिटींग संदर्भात माहिती दिली. श्री मकरंद शहापुरकर यांनी डिजीटल ऑरबिट ॲप अभियानाचे अहवाल प्रस्तुत केले. बैठकीचे सुत्र संचालन व आभार सचिव संदीप काबरा यांनी केले.



## कांचन शिरभे यांची नियुक्ती

जालना । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी असंघटित कामगार विभागाच्या महाराष्ट्र प्रदेश संघटक सचिवपदी जालना तालुक्यातील मानेगाव येथील कांचन शिरभे यांची मार्च २०२५ रोजी नियुक्ती करण्यात आली आहे. सदर नियुक्ती राष्ट्रवादी काँग्रेस असंघटित कामगार विभागाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मनोज व्यवहारे व जालना जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी केली आहे. कांचन शिरभे यांच्या निवडीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी त्यांचे अभिनंदन केले.

पान ६ वरून...

### आ. सुरेश धस यांच्या आमसभेत

मोठी शोकांतिका असल्याचे म्हणत दिव्यांग संघर्ष समिती महाराष्ट्रचे संस्थापक जीलानी शेख यांनी संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील मानधन लाभार्थ्यांच्या खात्यात त्वरित जमा करण्यात यावे तसेच संजय गांधी विभाग तिसऱ्या मजल्यावर असल्यामुळे वयोवृद्ध दिव्यांग यांचे चढण्या उतरण्यासाठी हाल होत आहेत सबंध संजय गांधी कार्यालय तळमजल्यावर घेण्यात यावी अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे तसेच मानधन जमा न झाल्यास पुढील आठवड्यात कुठलीच पुर्वसुचना न देता जिल्हाधिकारी कार्यालय येथील संजय गांधी निराधार अनुदान योजना कार्यालयात शेकडो लाभार्थ्यांसह तहसीलदार यांना व संबंधित बीड जिल्हायातील सर्वच तालुक्यातील तहसीलदारांना घेराव घालण्यात येणार असल्याचे ही वारंवार सांगूनही पाटोदा तहसील प्रशासनाला जाग येईना यामुळे तात्काळ निराधार संजय गांधी श्रावण बाळ विभाग तात्काळ पाटोदा तहसील इमारतीच्या तळमजल्यावर घ्यावा नसता लोकशाही पद्धतीने आंदोलन करू असा इशारा दिव्यांगाचे नेते जिलानी सय्यद यांनी दिली आहे.

### पोलीस स्टेशनच्या

निरीक्षक निलंगेकर हे सूचना देत होते. याच वेळी पोलीस कर्मचाऱ्यांना जमावाला हताळण्या संदर्भात सूचना देण्यात येत होत्या. संतप्त जमाव दगदफेक करत होता. याच वेळी जमाव पांगवण्या साठी सर्व प्रथम लाठीचार्ज, त्या नंतर

ढाल सेक्शनचा प्रयोग, त्या नंतर गॅस सेक्शनचा प्रयोग, रायफल सेक्शनचा प्रयोग करण्यात आला.या वेळी जमावाला भडकवणाऱ्या मुख्यसूत्रधारास शोधून त्याला ताब्यात कसे घ्यायचे या संदर्भात सूचना देण्यात आल्या. तसेच गोळीबार करून जमाव पांगवताना जखमी होऊन पडलेल्या इसमास ताब्यात घेईन त्याला उपचारार्थ रुग्णालयात कसे पाठवायचे याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. एकूणच या रंगीत तालीमच्या वेळी पोलीस कर्मचारी व आंदोलनकर्ते यांच्यात उत्साह पहावयास मिळाला.

## निगमानंदांच्या जन्मभूमीत फुलणार भक्तीचा मळा

### मच्छिंद्रनाथगडाच्या नारळी सप्ताहाची नांदेवलीत जय्यत तयारी

**शिरूर । शंकर भालेकर**

वै.महंत स्वामी निगमानंद महाराज यांच्या संकल्पनेतून गेल्या ४७ वर्षांपूर्वी साकारलेला श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथगडाचा फिरता नारळी सप्ताह यावर्षी हभप.वै.महंत स्वामी निगमानंद महाराजांच्याच जन्मभूमीत म्हणजे मौजे नांदेवली गावामध्ये आयोजित करण्यात आला आहे. हा सप्ताह सोहळा मंगळवार दि.२ एप्रिल पासून संत-महंत भाविक भक्तांच्या उपस्थितीत आरंभीत होणार आहे. सप्ताह सोहळा अगदी आठ दिवसावर येऊन ठेपल्यामुळे नांदेवली ग्रामस्थांच्या वतीने सप्ताहाची जय्यत तयारी चालू असून हा सप्ताह सोहळ्याच्या निमित्ताने नांदेवली गावामध्ये आरंभालाच संत- महंतांच्या संगतीत भक्तीचा मळा फुलणार आहे.

शिरूर कासार तालुक्यातील श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथगड हा वै.महंत



स्वामी निगमानंद महाराज अथक परिश्रमांमधून भाविक -भक्तांचे एक श्रद्धास्थान झाला आहे. या ठिकाणाहून महाराजांनी जनजागृतीसह अनेक समाज हिताचे उपक्रम राबवले आहेत. पंचक्रोशीतील शेतकऱ्यांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी श्री.मच्छिंद्रनाथ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री.निगमानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची सन १९८६ मध्ये स्थापना केली. या विद्यालयाच्या माध्यमातून हजारो गोरगरीब शेतकऱ्यांचे, शेतमजुरांचे विद्यार्थी मच्छिंद्रगडावरती आणि तळणेवाडी येथे शिक्षण घेत आहेत. तर इकडे अध्यात्माच्या पटलावरती ही अल्पकालावधीतच श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथगडाचे नाव ठळक स्वरूपात चमकू लागले आहे. वै. निगमानंद बाबांच्या संकल्पनेतून गेल्या ४७ वर्षापासून साकारलेला गडाचा फिरता नारळी सप्ताह केवळ अखंडितच परंपरेने चालू नसून हा सप्ताह सोहळा वर्षानुवर्ष व्यापक रूप घेत चालला





आहे. या सप्ताहाच्या निमित्ताने हजारो भाविक-भक्त एका भक्तीच्या छताखाली येथील आणि ज्ञानअमृताचे सेवन करून जीवनातील द्वेष मत्सर विसरून एकमेकाच्या पंगतीला बसून अध्यात्माचा गोड घास करून घेतील ही संकल्पना महाराजांनी राबवली आहे तिचा आज वटवृक्ष होताना पाहायला मिळत आहे.

वै.महंत स्वामी निगमानंद महाराज यांच्या वैकुंठ गमनानंतर गडाची परंपरा आणि श्रीगुरूंचा आदेश प्रमाणित ठेवून गडाचे उत्तर अधिकारी महंत जनार्धन महाराज यांनी या नारळी सप्ताहच्या वृक्षाला मोठ्या अट्टहासाने खतपाणी घालण्याचे काम चालवले आहे. महंत जनार्दन महाराजांचे कुशल नेतृत्व, गड आणि फडाचे व्यवस्थापन समाजापुढे एक शिस्तप्रिय नियमावली म्हणून कार्य करत असते. श्री. क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचा ४७ वा फिरता नारळी सप्ताह यावर्षी पुन्हा एकदा वै. महंत स्वामी निगमानंद महाराजांची कर्मभूमी श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथगडाच्या पायथ्याशीच म्हणजे जन्मभूमी नांदेवली या गावांमध्ये आयोजित करण्यात आला असल्याने जन्मभूमी आणि कर्मभूमीच्या मनोमिलनाने नववर्षाच्या आरंभी पार पडणारा हा सोहळा पंचक्रोशीतील भाविक-भक्तांसाठी भक्ती ज्ञानमृताची पर्वणीच ठरणार आहे. यामुळे सिंदफणाच्या तीरावरती निगमानंदांच्या जन्मभूमीत फुलणार भक्तीचा मळा असे भाविक भक्तातून बोलले जात आहे.

**हजारो भाविकांच्या सुख सोयीसाठी ग्रामस्थांकडून पूर्वतयारी**

श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडच्या नारळी सप्ताह प्रति वर्षप्रमाणे याही वर्षी हजारोच्या संख्येने भाविक भक्त उपस्थित राहून ज्ञानमृत श्रवण करणार आहेत त्याचबरोबर गावकऱ्यांच्या वतीने दिल्या जाणाऱ्या भोजनपंगतीचाही लाभ घेणार आहेत. सप्ताहाच्या निमित्ताने येणाऱ्या भाविक भक्तांच्या सुख सोयीसाठी कुठलीही उणीव भासू नाही यासाठी गावकऱ्यांच्या वतीने गेल्या दोन महिन्यापासून सप्ताहाची पूर्वतयारी मोठ्या जोमात चालू असून या ठिकाणी ज्ञान यज्ञासाठी भव्य स्वरूपामध्ये भक्तीचा मंडप उभारण्यात आलेला आहे.

cmyk

# संयुक्त किसान मोर्चा २८ मार्च रोजी करणार पंजाब सरकार विरोधात निदर्शने

चंदिगढ : पंजाब सरकारच्या निर्देशानंतर पंजाब पोलिसांनी ३५० हून अधिक अधिक आंदोलक शेतकऱ्यांना ताब्यात घेतलं आहे. यामध्ये शेतकरी नेते जगजितसिंग डल्लेवाल आणि सरवणसिंग पंढेर यांचा समावेश आहे. यावरून पंजाब सरकारच्या पोलिस कारवाईच्या विरोधात २८ मार्च रोजी देशभरातील विविध जिल्ह्यात निदर्शने करण्याचं आवाहन संयुक्त किसान मोर्चाच्या राष्ट्रीय समन्वय समितीने केलं आहे. मागील वर्षभराहून अधिक काळ सुरू असलेलं शेतकरी आंदोलन दडपण्याचा प्रयत्न पंजाब सरकारकडून केला जात, असल्याचा आरोपही शेतकरी नेते करत आहेत.

पंजाब सरकारच्या निर्देशानंतर पोलिसांनी खनौरी आणि शंभू सीमेवरील आंदोलक शेतकऱ्यांचे तंबू आणि मंचावर जेसीबी चालवली. तसेच शेतकऱ्यांचे ट्रॅक्टर आणि ट्रॉली हटवले. यावेळी विरोधक करणाऱ्या शेतकऱ्यांना पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे शेतकरी संघटना मात्र आक्रमक झाल्या आहेत. २८ मार्चला पंजाबमधील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर



शेतकरी निदर्शने करणार आहेत. संयुक्त किसान मोर्चाने पंजाब सरकार कॉर्पोरेट शक्तीसाठी शेतकऱ्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करत असल्याची टिका केली आहे. तसेच पोलिसांचा दबाव शांतपूर्ण निदर्शनांना आणि संघर्षाला जन्म घालत आहे. त्यामुळे संयुक्त किसान मोर्चा या अत्याचारी सरकारला मुळासकट उपटून फेकल्याशिवाय राहणार नाही. पंजाब सरकारसोबत केंद्र सरकारचेही हेच हाल होतील, असंही संयुक्त किसान मोर्चाने आवाहन केलं आहे. या कारवाईनंतर संयुक्त किसान मोर्चाने पंजाब सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. पंजाब सरकार शेतकऱ्यांच्या जीवाचं आणि उपजिवकेचं नुकसान करणाऱ्या कॉर्पोरेट धोरणांच्या विरोधाला दाबवण्याचा प्रयत्न करत आहे. यापूर्वी ३ आणि ४ मार्च २०२५ रोजी पंजाबमधील ८०० शेतकऱ्यांना अटक करण्यात आलं होतं. परंतु ५ मार्च रोजी पंजाब सरकारच्या विरोधात शेतकऱ्यांनी शांततापूर्ण विरोध निदर्शने केली होती. त्यामुळे अटक केलेल्या शेतकऱ्यांना पंजाब सरकारला मुक्त करावं लागलं होतं.दरम्यान, हमीभाव कायद्याच्या ग्यारंटीसह विविध मागण्यांसाठी संयुक्त किसान मोर्चा अराजकीय आणि मजूर किसान मोर्चाकडून १३ फेब्रुवारी २०२४ पासून दिल्ली चलोची हाक देण्यात आली. परंतु हरियाणा पोलिसांनी आंदोलक शेतकऱ्यांना शंभू आणि खनौरी सीमेवर अडवलं. परंतु शेतकरी मागण्यांवर ठाम राहिले.

## शेतकऱ्यांसाठी जलसंधारण योजना राज्यात प्रभावीपणे राबविणार



पुणे : 'जलस्रोतांची मर्यादा, पाणी टंचाई यामुळे शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. पाणी असेल तरच शेतीची उन्नती होते. म्हणून पाणी आडवणे-साठवणे, तलावांचे पुनरुज्जीवन करणे काळाची गरज बनली. त्यासाठी 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' तसेच 'नाला खोलीकरण व रुंदीकरण' या योजना सर्व गावात प्रभावीपणे कायमस्वरूपी राबविण्याच्या निर्णय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात शासनाने घेतला आहे,' असे प्रतिपादन राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री श्री. संजय राठोड यांनी केले.

या योजेनांच्या प्रभावीपणे अंमलबजावणीसाठी सुरू करण्यात आलेल्या 'गाळमुक्त धरण अर्थात .. पोर्टलचे उद्घाटन संजय राठोड यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने झाले, त्या प्रसंगी ते बोलत होते. या वेळी मृद व जलसंधारण विभागाचे सचिव गणेश पाटील, भारतीय जैन संघटनेचे संस्थापक शांतिलाल मुथा, राष्ट्रीय अध्यक्ष नंदकिशोर साखला, एमडी कोमल जैन, राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, मृद व जलसंधारण अधिकारी तसेच सरपंच, ग्रामसेवक उपस्थित होते. मंत्री श्री. राठोड म्हणाले, ''शासनाच्या खांद्याला खांदा लावून अनेक स्वयंसेवी संस्था जलसांधरणाची कामे करीत आहेत. शांतिलाल मुथा यांच्या नेतृत्त्वात बीजेसने या उपयुक्त पोर्टलची निर्मिती करून जलसंधारण विभागास सुपूर्द केले. या योजनेचा उद्देश, पात्रता, निकष, प्रशिक्षण अशी संपूर्ण माहिती एका क्लिकवर पोर्टलच्या माध्यमातून सर्वांना उपलब्ध झाली आहे. याचे उद्घाटन करताना मला अतिशय आनंद झाला.'' ''राज्यातील सर्व सरपंचांनी, शेतकऱ्यांनी, गावकऱ्यांनी या महत्त्वपूर्ण पोर्टलचा लाभ घेऊन आपल्या गावात या योजना मोठ्या प्रमाणावर राबविण्यासाठी पुढाकार घ्यावा. यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांचे मोठे सहकार्य लागणार आहे. निधीची कुठेही कमतरता पडणार असून थेट जिल्हाधिकाऱ्यांकडेच तो वर्ग करण्यात येईल,'' असे मंत्री राठोड यांनी सांगितले. गणेश पाटील यांनी या योजनेची भूमिका, महत्त्व स्पष्ट केले. शांतिलाल मुथा यांनी या पोर्टलची निर्मिती, उपयुक्तता, शेतकरी-सरपंचांसाठी असलेले महत्व थेट प्रात्यक्षिकाद्वारे सांगितले. तर नंदकिशोर साखला यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## ठिबक संचाच्या देखभालीसाठी कराव्या लागणाऱ्या आम्ल आणि क्लोरिन प्रक्रिया

कमी पाण्यात अधिक उत्पादन यासाठी सूक्ष्म सिंचनाचा भाजीपाला व फळे पिकात अवलंब केला जातो.परंतु आता उसासारख्या पिकात ठिबक सिंचनाचा वापर होताना दिसत आहे.म्हणजेच ठिबक सिंचनाचा वापर वाढत आहे.सूक्ष्म सिंचन पद्धती ठिबक सिंचन संचाची काळजी व देखभाल घेणे गरजेचे असते. ठिबक सिंचन संचाची कार्यक्षमता कायम राखण्यासाठी संचाची वेळोवेळी देखभाल करणे गरजेचे आहे. जेणेकरून वेळेची, ऊर्जेची बचत होते व संचाचे जीवनमान वाढते.या लेखात आपणठिबक संचाच्या देखभालीसाठी कराव्या लागणाऱ्या आम्ल व क्लोरिन प्रक्रियेविषयी माहिती घेणार आहोत.

ठिबक संचाच्या देखभालीसाठी आम्ल प्रक्रिया : लॅटरल व ड्रीप मध्ये साचलेले क्षारजसे कॅल्शियम कार्बोनेट,मॅग्नेशियम कार्बोनेट किंवा फेरिक ऑक्साइड ठिबक सिंचन संचाचे कार्य मंदावतात अथवा बंद पाडतात. हे जमा झालेले क्षार स्वच्छ करण्यासाठी आम्ल प्रक्रिया करावी लागते. त्यासाठी सल्फ्युरिक आम्ल(६५ टक्के), हायड्रोक्लोरिक आम्ल (३६ टक्के), नायट्रिक आम्ल (६० टक्के) किंवा फोसफेरीक आम्ल (८५ टक्के)यापैकी कुठलेही उपलब्ध होणारेआम्ल वापरू शकता.आम्ल द्रावण तयार करण्याच्या पद्धती : एका प्लॅस्टिकच्या बादलीमध्ये एक लिटर पाणी घेऊन त्यात ॲसिड मिसळत जावे. आम्ल मिसळताना मध्येमध्ये पाण्याचा सामू पीएच मीटर नेआता लिटमस पेपरने मोजावा. पाण्याचा सामू तीन ते चार होईपर्यंत ( लिटमस पेपर चा रंग फिकट गुलाबी होईपर्यंत) पाण्यात ॲसिड मिसळत जावे. पाण्याचा सामू तीन ते चार करण्यासाठी किती ऍसिड लागले ते लिहून ठेवावे. पंप चालू केल्यानंतर संचाच्या शेवटचा ड्रीपर पर्यंत पाणी पोहोचण्यासाठी किती वेळ लागतो याची नोंद घ्यावी. साधारणतः पंधरा मिनिटे वेळ लागतो असे गृहीत धरावे.

ठिबक संचाच्या देखभालीसाठी क्लोरिन प्रक्रिया : ठिबक संचातील पाईप,लॅटरल, दिफर्स यामध्ये झालेल्या शेवाळ वाढीमुळे संचाची कार्यक्षमता मंदावते.ठिबक सिंचन संच यामध्ये जैविक व सेंद्रिय पदार्थांचे झालेली वाढ रोखण्यासाठी क्लोरिन प्रक्रिया चा उपयोग होतो. यासाठी ब्लिचिंग पावडर चा उपयोग करावा. त्यामध्ये ६५ टक्के मुक्त क्लोरीन असतो.अथवा सोडियम हैपो क्लोराईड वापरावे.त्यामध्ये १५% मुक्त क्लोरीन असतो. ब्लिचिंग पावडर हा सर्वात स्वस्त व सहज बाजारात उपलब्ध होणारा क्लोरीनचा स्त्रोत आहे. परंतु सिंचनाच्या पाण्यामध्ये कॅल्शियमचे प्रमाण (२० पीपीएम पेक्षा जास्त) जास्त असल्यास ब्लिचिंग पावडर वापरू नये. आम्ल प्रक्रिया ची गरज असल्यास टीक्लोरिन प्रक्रिया पूर्वीच करून घ्यावी. कारण बाहेर पडणारा क्लोरीन वायू विषारी असतो. क्लोरिन प्रक्रिया खालील प्रमाणे करावे. ठिबक सिंचन संचाच्या विसर्ग दराप्रमाणे पूर्ण संचातून २० ते ३० पीपीएम क्लोरीन जाईल एवढे क्लोरीन द्रावण संचात सोडून संच २४ तास बंद ठेवावा. क्लोरीनचे द्रावणातील प्रमाण मोजण्यासाठीक्लोरीन पेपर चा उपयोग करावा. नंतर संपूर्ण ठिबक संच फ्लशकरून घ्यावा.



# डाळिंबाची सुधारित लागवड पद्धत

डाळिंब हे भारतातील एक महत्त्वाचे फळ पीक आहे. त्याचा उगम इराणमध्ये झाला आणि स्पेन, मोरोक्को, इजिप्त, इराण, अफगाणिस्तान आणि बलुचिस्तान यांसारख्या भूमध्यसागरीय देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर डाळिंबाची शेती केली जाते. म्यानमार, चीन, यूएसए काही प्रमाणात त्याची लागवड केली जाते.

डाळिंबाच्या लागवडीत भारताचा जगात पहिला क्रमांक लागतो. भारतात, महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, तामिळनाडू राजस्थान ही प्रमुख डाळिंब उत्पादक राज्ये आहेत. ९.४५ लाख मे.टन वार्षिक उत्पादन आणि १०.५ मेट्रिक टन/हेक्टर उत्पादकतेसह ९० हजार हेक्टर क्षेत्रासह महाराष्ट्र आघाडीवर आहे. भारताच्या एकूण क्षेत्रफळाच्या ७८ टक्के आणि एकूण उत्पादनाच्या ८४ टक्के वाटा महाराष्ट्र राज्याचा आहे.

हवामान : यशस्वी डाळिंब लागवड मूलतः कोरडे आणि अर्ध-रखरखीत हवामान असते, जेथे थंड हिवाळा आणि उच्च कोरड्या उन्हाळ्याच्या गुणवत्तेमुळे फळांचे उत्पादन शक्य होते. फळांच्या विकासासाठी इष्टतम तापमान ३५ -३८ डिग्री सेल्सियस आहे. समुद्रसपाटीपासून ५०० मीटर उंच असलेला प्रदेश डाळिंब लागवडीसाठी योग्य आहे.

माती : पिकाची गरज लक्षात घेऊन, कमी-सुपीक ते उच्च-सुपीक जमिनीपर्यंत वेगवेगळ्या



प्रकारच्या मातीत डाळिंब पीक घेता येते. तथापि, खोल चिकणमातीमध्ये, ते उत्कृष्ट उत्पादन देते. ते जमिनीतील क्षारता आणि क्षारता एका मर्यादेपर्यंत सहन करू शकते. डाळिंब शेतीसाठी ६.५ ते ७.५ दरम्यान पीएच श्रेणी असलेली माती आदर्श आहे.

प्रसार पद्धत : डाळिंबाची झाडे हार्डवुड कटिंग, एअर लेयरिंग आणि टिश्यू कल्चरद्वारे व्यावसायिकरित्या प्रसारित केली जाऊ शकतात.

हार्डवुड कटिंग प्रसार - ही पद्धत सोपी असली तरी तिचा यशाचा दर कमी आहे, त्यामुळे ही पद्धत शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय नाही. ९ ते १२ इंच (२५ ते ३० सें.मी.) लांबीच्या एक वर्षाच्या झाडापासून निवडलेल्या छाटणीसाठी, ४-५ काड्या जास्त रुजण्यासाठी आणि जगण्यासाठी उत्तम असतात. एअर-लेयरिंग प्रसार - नवीन रोपे वाढवण्याची शेतकऱ्यांची ही सर्वात सामान्य पद्धत आहे. एअर लेयरिंग पद्धतीसाठी, २ ते ३ वर्षे जुनी झाडे निवडाली जातात आणि चांगल्या मुळांसाठी (१,५०० ते २,५०० ) उपचार केला जातो. एका रोपापासून सुमारे १५० ते २०० रुजलेली कलमे मिळू शकतात. लेयरिंगसाठी पावसाळा सर्वात योग्य आहे. मुळांसाठी सुमारे ३० दिवस लागतात. ४५ दिवसांनंतर, स्तरित रोपे मातृ रोपापासून वेगळी कली जातात. तज्ञ डाळिंब उत्पादक मुळांच्या रंगाचे निरीक्षण करून विलग होण्याची वेळ ओळखतात जेव्हा ते तपकिरी होऊ लागतात तेव्हा स्तरित कलमे वेगळे करतात. नंतर ती पॉलीबॅगमध्ये उगवली जातात आणि शेड नेट किंवा ग्रीनहाऊसमध्ये ९० दिवसांपर्यंत ठेवतात.

टिश्यू कल्चर प्रसार : टिश्यू कल्चर हे वनस्पतींच्या गुणाकाराचे आगाऊ आणि जलद तंत्र आहे. या तंत्राचा वापर करून, तुम्ही कमी कालावधीत रोगमुक्त लागवड साहित्य मिळवू शकतो. ही टिश्यू कल्चर रोपे डाळिंब रोपवाटिकेत उपलब्ध आसतात ; ही रोपे विश्वासार्ह स्त्रोताकडून खरेदी करावीत.

व्यावसायिक डाळिंबाच्या जाती : भारतात वाढणाऱ्या या व्यावसायिक जाती आहेत. भगवा, मृदुला, गणेश, ज्योती, जालोरे सीडलेस, कंधारी, फुले अरक्त, फुले भगवा सुपर, भगवा सिंदूर. देशांतर्गत आणि निर्यातीसाठी जास्त मागणी असल्यामुळे भागवा ही सर्वात जास्त लागवड केलेली जात आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७५७ : प्लासीच्या लढाईत इंग्रजांनी बंगालच्या नबाबाचा पराभव केला. या विजयामुळे ईस्ट इंडिया कंपनी सरकारचा पाया घातला गेला आणी ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीने कोलकाता काबीज केले.
१७८८ : 'कलकत्ता गॅझेट' या वृत्तपत्रामध्ये भारतीय बंगाली भाषेतील पहिली जाहिरात प्रकाशित करण्यात आली.
१८०७ : गुलाम व्यापार कायदा करून ब्रिटिश साम्राज्य मध्ये गुलामांचा व्यापार बंद करण्यात आला.
१८०७ : इंग्लंड देशांमध्ये प्रथम रेल्वे प्रवासी सेवा सुरू करण्यात आली.
१८८१ : लोकमान्य टिळकांनी संपादित केलेल्या 'मराठा' या दैनिकाची सुरूवात झाली.
१८८५ : पुणे यथे फर्ग्युसन महाविद्यालय सुरू झाले.
१८९८ : शिवराम परांजपे यांनी साप्ताहिक 'काळ' चा पहिला अंक काढला.
१८९८ : स्वामी विविकानंद यांनी भगिनी निवेदिता यांना ब्रह्मचर्याची दीक्षा दिली होती.
१९०५ : मांचुरियातील पोर्ट ऑर्थर सिटी येथील लढाईत जपानी सैन्याने रशियाचा पाडाव केला. आशियाई देशाने युरोपातील देशाचा केलेला पराभव ही त्या काळातील अतिशय महत्त्वाची घटना होती.
१९२९ : लाहोर काँग्रेसचे ऐतिहासिक अधिवेशन सुरू झाले.
१९३६ : मध्य प्रदेश उच्च न्यायालयाची स्थापना
१९४२ : दुसरे महायुद्ध  जपानी फौजांनी मनिला, फिलिपाइन्सवर ताबा मिळवला.
१९४५ : दुसरे महायुद्ध  दोस्त राष्ट्रांनी न्यूरेम्बर्ग, जर्मनी येथे तुफानी बॉम्बवर्षाव केला.
१९५४ : राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी 'भारतरत्न' पुरस्कारांची स्थापना केली.
१९८९ : मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार सफदर हश्मी यांची नवी दिल्ली येथे पथनाट्य करत असतानाच निर्घृण हत्या
१९९७ : जगदीश शरण वर्मा यांनी भारताचे २७ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९८ : डॉ. सरोजिनी बाबर यांना पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वसंत गोवारीकर यांच्या हस्ते सन्माननीय डी. लिट. पदवी प्रदान
२००० : १७ वर्षीय जलतरणपटू रुपाली रेपाळे हिने दक्षिण आफ़्रिकेतील रॉबेन आयलंड खाडी पोहून पार केली. ही खाडी पोहणारी ती वयाने सर्वात लहान जलतरणपटू आहे.
२००० : पनामा सरकारने ८५ वर्षांच्या कालखंडानंतर पनामा कालव्याचा पूर्ण ताबा घेतला.
२००० : संत ज्ञानेश्वरांची प्रतिमा असलेल्या चलनी नाण्याचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते प्रकाशन.
२०१३ : मणिपूर उच्च न्यायालयाची स्थापना
२०१३ : मेघालय या केंद्रशाशित प्रदेशाची राजधानी शिलांग येथे उच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली.
२०१७ : राजस्थान राज्याच्या बिकानेर शहरातील महिला तनुश्री परीक यांनी भारत देशाच्या सीमा सुरक्षा बल(बीएसएफ) च्या महिला अधिकारी बनून आपल्या देशाचे व राज्याचे नाव उज्वल केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८९६ : सुप्रसिध्द कादंबरीकार र.वा. दिघे.
१८३८ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या संस्थापक सदस्यांमधील एक सर विल्यम वेदरबर्न यांचा जन्मदिन. त्यांनी सन १८८९ साली काँग्रेसचे अध्यक्षपद भूषविले आहे.
१९१४ : अमेरिकन कृषी शास्त्रज्ञ व हरित क्रांतीचे जनक नॉर्मन अर्नेस्ट बोरलॉग यांचा जन्मदिन
१९१८ : ब्रिटीश भारतीय सैन्य दलाचे अधिकारी कर्नल प्रेम कुमार सहगल यांचा जन्मदिन
१९२० : आयझॅक असिमॉव्ह  अमेरिकन जीवरसायनशास्त्रज्ञ आणि विज्ञानकथालेखक (मृत्यू: ६ एप्रिल१९९२)
१९३२ : व.पु. काळे, मराठी साहित्यिकगव्हाची पीक देणारी जात शोधून काढणारे शास्त्रज्ञ नॉर्मल बोरलॉग
१९३२ : हरचंदसिंग लोंगोवाल  अकाली दलाचे अध्यक्ष (मृत्यू: २० ऑगस्ट १९८५)
१९३३ : अंतराळ संशोधक वसंतराव गोवरीकर
१९४८ : प्रसिद्ध भारतीय चित्रपट अभिनेता फारुख शेख यांचा जन्मदिन.
१९५६ : ग्वाल्हेर घराण्याचे गायक मुकूल शिवपुत्र यांचा जन्म.
१९५९ : किर्ती आझाद  क्रिकेटपटू आणि खासदार
१९६० : रमण लांबा  क्रिकेटपटू (मृत्यू: २३ फेब्रुवारी १९९८)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३१६ : अल्लाउद्दीन खिलजी  दिल्लीचा सुलतान (जन्म:)
१९३१ : भारतीय पत्रकार आणि राजकारणी गणेश शंकर विद्यार्थी यांचे निधन. (जन्म: २६ ऑक्टोबर १८९०)
१९३५ : मोरेश्वर वासुदेव तथा नरकेसरी अभ्यंकर  स्वातंत्र्यसैनिक, टिळकांच्या विचारसरणीचे मध्य प्रांताचे काँग्रेस नेते, वकील (जन्म: १९ ऑगस्ट १८८६)
१९४० : आसामी कादंबरीकार उपन्यास सम्राट रजनीकांत बर्दोलोई यांचे निधन. (जन्म: ११ डिसेंबर १८६७)
१९४३ : हुतात्मा वीर भाई कोतवाल (जन्म:)
१९४४ : महर्षि विठ्ठल रामजी शिंदे  अस्पृश्यता निवारण हे जीवनध्येय मानलेले व्यासंगी समाजसुधारक (जन्म: २३ एप्रिल १८७३)
१९७५ : सौदी अरेबियाचा राजा फैसल यांचे निधन
१९८९ : सफदर हश्मी  मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार (जन्म: १२ एप्रिल १९५४)
१९९१ : जयपूर-अत्रौली घराण्याचे गायक वामनराव सडोलीकर यांचे निधन. (जन्म: १६ सप्टेंबर १९०७)
१९९३ : सुप्रसिध्द लेखक मधुकर केचे.
१९९९ : विमला फारुकी  भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या आणि महिला चळवळीतील कार्यकर्त्या (जन्म:)
२००२ : अनिल अग्रवाल  पर्यावरणवादी (जन्म: १९४७)
२०१४ : भारतीय चित्रपट अभिनेत्री नंदा यांचे निधन

# चाळणी झालेल्या रस्त्यांवर अजितदादा अवतरले

## मुखवटे घालून लक्ष्यवेधी आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे







बीड। प्रतिनिधी

बीड शहरांतर्गत रस्त्यांची दुरावस्था झाली असुन ठिकठिकाणी पडलेले जीवघेणे खड्डे,वाळुमिश्रित खडीचा धुराळा उडत असुन अपघातांची संख्या वाढली असुन चाळणी झालेल्या रस्त्यावरून वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे. त्यामुळे बीड शहरातील ११० कोटी रुपयांच्या ४० फुट रूंदीच्या १७ मुख्य रस्त्यांच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत राज्याच्या नगरविकास विभागाकडे वर्षभरापूर्वी पाठविण्यात आलेला प्रस्ताव लालफितीत अडकला असुन त्यास तातडीने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्यात यावा या प्रमुख मागणीसह धुळे ते सोलापूर रस्त्यावरील खड्डे कायमस्वरूपी बुजवुन रखडलेले दुभाजकांचे काम पूर्ण करून साईडपंखे भरण्यात यावेत. बीड ते अहिल्यानगर मार्गाचे काम संथगतीने होत असुन प्रमुख शासकीय कार्यालये असणाऱ्या रस्त्यांवर गर्दी होत असुन जलदगतीने पुर्ण करण्यात यावे या मागण्यांसाठी सामाजिक सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.२४ वार सोमवार रोजी वाजता कारंजा टॉवर ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नगरपरिषद बीड कार्यालय अजितदादा पवार यांचे मुखवटे घालून चाळण झालेल्या रस्त्याची पाहणी करत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड,सुदाम तांदळे, मुबीन शेख,, शेख मुस्ताक, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले आदी सहभागी होते. मुख्याधिकारी नगरपरीषद बीड निता अंधारे यांच्या मार्फत उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले.

बीड नगर पालिकेने एक वर्षापूर्वी बीड शहरातील ११० कोटी रूपयांच्या ४० फुट रूंदीच्या १७ मुख्य रस्त्यांच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत राज्याच्या नगरविकास विभागाकडे पाठवलेला प्रस्ताव लालफीतीत अडकला आहे. शहरातील नगर रोड ते पालवण चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते संतोषीमाता मंदिर, राजुरी वेस - बलभीम चौक -माळीवेस , बलभीम चौक ते दगडी पुल,थिगळे कॉम्प्लेक्स ते जालना रोड, जिजामाता चौक ते मसरतनगर अशा एकुण शहरातील १७ अत्यंत महत्त्वाच्या प्रमुख रस्त्यांचा प्रस्ताव वर्षभरापूर्वी बीड नगरपालिकेने नगर विकास विभागाकडे पाठविला आहे.१७ रस्ते ४० फुट रूंदीचे होणार असुन त्यासाठी ११० कोटी रुपये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेंतर्गत होणार आहेत. बीड शहरातील रस्त्यांची दुरावस्था झाली असुन चाळणी झालेल्या रस्त्यावरून वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे.शहरात वर्दळीचा असलेला छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज ते कारंजा टावर या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असुन वाळु मिश्रित खडीचा धुरळा उडत आहे. वाहनांचे अपघात होत आहेत.त्यामुळे तातडीने प्रस्ताव मंजूर करून रस्त्यांसाठी निधी देण्यात यावा. शहरातील धुळे ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बार्शी नाका ते राष्ट्रवादी भवन पर्यंत मागील अनेक वर्षांपासून मोठमोठे जीवघेणे खड्डे पडले असुन या खड्ड्यात वाहने आदळुन अपघातात अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. तर या मार्गावरील जालना रोड वरील दुभाजकांचे काम अर्धवट असुन दुभाजकांसाठी जागा सोडण्यात आली असुन त्याठिकाणी माती टाकण्यात आली आहे.त्यामुळे रस्ता ओलांडताना वाहनांची चाके फसुन अपघाताच्या घटना घडत आहेत.तर दुसरीकडे महामार्गावरील मुख्य सिमेंट रस्त्याच्या बाजुचे साईडपंखे भरण्यात आले नसुन दुचाकी वाहनचालकांचे घसरून पडण्याचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे रखडलेली कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत.बीड शहरातील मुख्य रस्ता असलेल्या बीड ते अहिल्यानगर रस्त्याची दुरावस्था झाली आहे. अनेक वर्षांपासून या रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केल्यानंतर या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली. मात्र काम करणाऱ्या ठेकेदार यंत्रणेने नियोजन शून्य काम केल्याने दीड वर्ष लोटूनही शहरातील दोन किलोमीटर अंतराचा रस्ता अद्याप पूर्ण झालेला नाही. बालेपीर पासून छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत रस्ता पूर्ण झाला असला तरी काही भागातील खड्डे ,रस्त्यांचे जोड कायमच आहेत. या ठिकाणी खडी, धुराळा उडून वाहन चालकांना त्रास होतो. या रस्त्यावर जिल्हा न्यायालय, समाज कल्याण कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, बांधकाम विभागाचे कार्यालय ,मुख्य प्रशासकीय इमारत अशी ६६ शासकीय कार्यालय असल्याने दुचाकीची वाहतूक मोठी आहे. त्यामुळे कायम गर्दी असते त्यामुळे संथगतीने चालणारे रसत्याचे काम जलदगतीने पुर्ण करण्यात यावे.

---

## पाटोदा तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच पदाचे आज आरक्षण सोडत

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील ग्रामपंचायत सन २०२५ ते २०३० पर्यंत होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सरपंच पदाच्या आरक्षण सोडत आरक्षण सोडतीसाठी उपस्थित राहणे बाबत तहसीलदार नेलवाड यांनी कळवले. पाटोदा तालुक्यातील ५९ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडत तहसील कार्यालय पाटोदा येथे मंगळवारी २५/३/ २०२५ रोजी आरक्षण सोडत होणार आहे आरक्षण सोडती साठी आपण मंगळवार दिनांक २५/३/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय पाटोदा येथे उपस्थित रहावे तहसीलदार निळवाड साहेब यांनी कळविले आहे.

## सुट्टीच्या तीन दिवस दुय्यम निबंध कार्यालय सुरू राहणार

**जालना । प्रतिनिधी**

**सुट्टीच्या तीन दिवस जालना जिल्ह्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालय सुरू असणार आहे. अशी माहिती मुद्रांक जिल्हा अधिकारी श्री मुळे यांनी दिली आहे. यावेळी ते म्हणाले की दि.२९.०३.२०२५ ते दि.३१.०३.२०२५ या तीन सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालये चालू ठेवण्याबाबत उदयराज चव्हाण नोंदणी उप महानिरीक्षक मुख्यालय महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडून आदेश आले आहेत या आदेशावरून संपूर्ण राज्यात दुय्यम निबंधक कार्यालय सुट्टीच्या तीन-दिवस कार्यालय सुरू राहणार आहे. असे आदेश प्राप्त झाले आहे.**

वार्षिक बाजारमूल्य दर तक्ते दरवर्षी १ एप्रिल रोजी प्रसिध्द्र होत असल्याने दुय्यम निबंधक कार्यालयात, मार्च महिन्यात दस्त नोंदणीसाठी पक्षकारांची गर्दी होत असते. तसेच महत्वाच्या सणामुळे देखील दस्त नोंदणीसाठी दुय्यम निबंधक कार्यालयात पक्षकारांची गर्दी वाढत आहे, हे लक्षात घेवून आणि आर्थिक वर्ष २०२४-२०२५ या वर्षाचा इष्टांक पूर्ण करण्याच्या दृष्टीने दि.२९.०३.२०२५ ते दि.३१.०३.२०२५ या आर्थिक वर्षअखेर असलेल्या सुट्टीच्या दिवसात सर्व नोंदणी कार्यालये सुरु ठेवण्यात येत आहेत. उदयराज चव्हाण नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश आहे.

## दिव्यांग क्रीडा स्पर्धेत छत्रपती शाहू विद्यालयाची चमकदार कामगिरी

आष्टी प्रतिनिधी

दिव्यांग आयुक्तालय महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने नागपूर येथे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय मुला-मुलींच्या दिव्यांग क्रीडा स्पर्धेमध्ये आष्टी येथील छत्रपती शाहू महाराज निवासी अपंग विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तीन सुवर्णपदक ,दोन कांस्यपदक व एक रौप्य पदक मिळवत चमकदार कामगिरी केली आहे त्यांच्या या यशाबद्दल जिल्हा समाज कल्याण अधिकारी मेश्राम मॅडम सामाजिक वैद्यकीय कार्यकर्ता नखाते साहेब संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुखदेवरावजी पोकळे मुख्याध्यापक विजयकुमार झांजे यांनी विजय खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.



नागपूर येथे दिव्यांग आयुक्तालय महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्यस्तरीय मुला-मुलींच्या क्रीडा स्पर्धा २१ व २२ मार्च रोजी आयोजित करण्यात आले होत्या या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला त्यामध्ये बीड जिल्ह्यात वेगवेगळ्या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे एकूण दिव्यांग क्रीडा स्पर्धेत बीड जिल्ह्यांनी चमकदार कामगिरी केली आहे यामध्ये आष्टी येथील छत्रपती शाहू महाराज निवासी अपंग विद्यालयातील वेगवेगळ्या स्पर्धा प्रकारात रामेश्वर काटे प्रथम क्रमांक दोन कुबड्यावर धावणे,भाऊसाहेब एकनाथ कावळे प्रथम ५० मीटर धावणे ,रामेश्वर कारभारी काटे प्रथम व्हीलचेअर वर बसून सॉफ्ट बॉल थ्रो , भाऊसाहेब एकनाथ कावळे दुतीय क्रमांक १०० मीटर धावणे,आयान हिम्मत पठाण १०० मीटर धावणे तृतीय क्रमांक, हरी ओम रमेश गोरे एक कुबडीवर धावणे तृतीय क्रमांक,या विद्यार्थ्यांनी तीन सुवर्णपदक व दोन कांस्यपदक मिळवले आहेत या स्पर्धेसाठी शाळेचे क्रीडा शिक्षक बाळासाहेब घोडके सहाय्यक शिवाजी रणसिंग यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल शाळेतील मुख्याध्यापक शिक्षक इतर कर्मचारी व सर्व स्तराकडून कौतुक केले जात आहे.

## वसंतदादा पाटील महाविद्यालयात शहीद दिन साजरा



पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शहीद दिन साजरा करण्यात आला.

प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रोफेसर सतिश माउलगे होते. त्यांच्या हस्ते शहीद भगतसिंग, शहीद राजगुरू व शहीद सुखदेव यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पमाल्यार्पण करण्यात आले.

व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक प्रोफेसर गणेश पाचकोरे, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, कर्मचारी कल्याण सचिव प्रा. शरद पवार, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. मनिषा गाढवे, प्रोफेसर महादेव काळे, प्रा. अशोक दहिफळे, डॉ. उमाकांत वानखेडे, डॉ. शकुंतला बडे आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. शरद पवार यांनी केले. आभार प्रो. महादेव काळे यांनी मानले. अभिवादन कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## निवृत्त फौजीची गळफास घेऊन आत्महत्या

म्हसोबावाडी। प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील देवळगावघाट येथील निवृत्त फौजी दादासाहेब नामदेव दाणवे वय अंदाजे ३९ यांनी मालकी असणाऱ्या शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली त्यांचा मृतदेह सुलेमान देवळा येथे शवच्छेदानासाठी घेऊन आणण्यात आला यावेळी सुलेमान देवळा येथील वैद्यकीय अधिकारी सौ.पैठणे मॅडम यांच्या उपस्थितीत हे करण्यात आले व पंचनामा प्रसंगी पो.ह.खंडागळे साहेब व पो.माने साहेब यांनी केला आत्महत्याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही तरी पुढील तपास पो.ह.खंडागळे साहेब करीत आहेत. त्यांच्या पाश्चात्य त्यांची पत्नी स्वाती नामदेव दाणवे व मुलगा प्रज्वल दाणवे व आई वडिल,बंधु वहिनी असा परिवार आहे. तरी या दुखतं घटनेनं पंचक्रोशीतुन हाळ व्यक्त होत आहे.

## जालना बसस्थानकात दररोज मोफत पाणी वाटप



जालना/प्रतिनिधी : जालना बसस्थानकात दरवर्षीप्रमाणे यावर्षी तसेच पाच वर्षापासून जारच थंड पाणी प्रवाशांना मोफत देण्यात येतं तसेच दररोज ९० ते १०० जारमार्फत पाणी वाटप केल्या जातात तसेच दररोज दोन हजार महिला पुरुष या ठिकाणी थंड पाणी पिण्याचा लाभ घेतात सदरील या ठिकाणी पंचमुखी महादेव संस्थान मार्फत मोफत पाणी वाटप करण्यात येते असे पाणी वाटप करणाऱ्या व्यक्तीकडून सांगण्यात आले

## इफ्तार पार्टीच्या माध्यमातून आंबेडकरी अनुयायांनी दिला एकता व समानतेचा संदेश

पाटोदा। प्रतिनिधी



दरवर्षी आंबेडकरी अनुयायांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या माध्यमातून ईफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात येत असते या अनुषंगाने दि.२३ मार्च रविवार रोजी पाटोदा शहरातील हजरत राज मोहमंद दर्गा मस्जिद येथे ईफ्तार पार्टी आयोजित करण्यात आली होती. प्रेषित मोहमंद पैगंबर यांनी जगाला शांतीचा मार्ग दाखविला तर भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यामातून समानता लोकशाही अबाधित ठेवली मात्र सध्या समाजा-समाजात द्वेष निर्माण करण्यात येत आहे.त्या सर्वांना तुम्ही कितीही करा द्वेष,माझ्या बाबासाहेबांच्या विचारांचा बालेकिल्ला असलेला पाटोदा तालुका एकतेचा समानतेचा संदेश देत असल्याचे दिसून आले यावेळी पाटोदा तालुक्यातील आंबेडकरी अनुयायी, मुस्लिम समाज,हिन्दू समाज बांधवांनी एकत्रित येऊन इफ्तार पार्टीचा आनंद साजरा करत एकतेचा संदेश दिला. यावेळी नगराध्यक्ष राजु जाधव,मा.नगराध्यक्ष गणेश नारायणकर,मा.सरपंच अँड. सय्यद वहाब रिपाइंचे तालुकाध्यक्ष डॉ. नरेंद्र जावळे, संदीप जावळे सर,सय्यद सज्जाद,मराठा सेवक बाबा तिपटे,इम्रान नुर,शेख जव्वाद,प्रकाश जावळे,प्रदिप जावळे,सुरज जावळे,रफिक भाई,बापु नवले,दादा जावळे,सादेक पिंजारी,सुभाष गुंड पत्रकार हमीदखान पठाण, जावेद शेख, डॉ. हरिदास शेलार आदी आंबेडकरी विचाराचे पाईक उपस्थित होते.यावेळी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सय्यद साजेद यांची ८ वर्षीय सय्यद नाजीया(इक्रा) हीने आपल्या जिवनातील पहिला रोजा ठेवल्याने सर्वच उपस्थित मान्यवरांनी तिचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या...

## भाटवडगाव, नविन वसाहत सार्वजनिक रस्ताच अज्ञात व्यक्तीने अडवला

### विद्यार्थी,रहिवासी यांना रहदारीस मज्जाव : रस्ता पुर्ववत चालू करून देण्याची रहिवाशांची मागणी

माजलगाव। प्रतिनिधी

शहरापासून जवळच असलेल्या भाटवडगाव हद्दीतील नविन वसाहत येथील गट नंबर १३८ येथील शिक्षक वसाहतीत अज्ञात व्यक्तीने मुख्य रस्त्यावरच पत्र्याचे शेड उभे केले असून येथील रहिवासी व विद्यार्थ्यांची गैरसोय केली आहे.तो मुख्य रस्ता रहदारीस पुर्वरत चालू करून देण्याची मागणी भाटवडगावचे सरपंच,ग्रामसेवक यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे रहिवासी यांनी करुन त्याच्या प्रती संबंधित वरिष्ठ अधिकारी यांना दिल्या आहेत.



नविन भाटवडगाव येथील रहिवाशांनी सरपंच/ग्रामसेवक यांना दिलेल्या निवेदनात असे नमूद केले आहे की, माजलगाव शहरा पासून जवळच असलेल्या भाटवडगाव,नविन वसाहतीतील गट नंबर,१३८ मधील चंद्रशेखर साखरे व उत्तम राठोड यांच्या मधून जाणारा जो सार्वजनिक रस्ता आहे तो रस्ता मुळ मालक चोरमले यांनी सोडलेला आहे व तो पर्ववत आहे असे सागंतात परंतु या रस्त्यावर अज्ञात व्यक्तीने पत्र्याचे शेड उभारून सार्वजनिक रस्ताच अडवला आहे या रस्त्यावर रोजच शेकडो विद्यार्थी, विद्यार्थींनी शाळेत जातात हा रस्ता जवळपास दिड ते दोन कि.मी.लाबीचा आहे या रस्त्यावर कोठेच कोणाचा प्लॅट नाही मग हाच प्लॅट कसा असा? प्रश्न उपस्थित केला जात आहे.हा सार्वजनिक रस्ता अडविल्या मुळे येथील रहिवासी व विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे तो रस्ता पुर्ववत रहदारीस चालू करून द्यावा नसता ते पत्र्याचे शेड रहिवासी काढून टाकतील होणाऱ्या परिणामास प्रशासन जबाबदार राहिल असा इशारा सरपंच,ग्रामसेवक यांना लेखी निवेदनाद्वारे देवुन निवेदनाच्या प्रती उप विभागीय अधिकारी माजलगाव, तहसीलदार माजलगाव,पोलीस निरीक्षक, माजलगाव शहर पोलिस, पंचायत समिती गटविकास अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.या निवेदनावर रहिवासी बाबुराव जाधव,तानाजी सिरसाठ,प्रशांत जगनाडे,विजय दळवी,विश्वंभर जोशी,आडे जी. एम,संजय राठोड, प्रकाश राठोड, राजाभाऊ राठोड,दत्ता राऊत,चिवाजी खटले,कुर्हाडे सोमेश्वर,गणेश राऊत आदीसह ५० रहिवासी यांच्या सह्या आहेत

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/१४१
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १७/०३/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १)कांता मोकिंदा जायकर सर्व्हे नं. ११ सहन प्लॉट नं. -२७ सि.स.नं. -३११९ न.प.मि.न.-१८ -१६१ -२७११ सहन प्लॉट - २८- सि.स.नं. -३१२० न.प.मि.न.-१८-१६१ -२८ चे वारसा अधारे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. () दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- ९ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम :प्लॉट नं. २९
दक्षिण- ९ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तर : प्लॉट नं. २७ मधील
रामेश्वर कान्हुजी मंजाळ यांचा प्लॉट

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# बीड जिल्हा परिषदेचा १५ कोटी २१ लाखाचा शिलकीचा अर्थसंकल्प

## सीईओ आदित्य जीवने यांनी केला अर्थसंकल्प जाहीर

**बीड | प्रतिनिधी**

**बीड जिल्हा परिषदेच्या २०२५=२६ या वर्षातील आरंभीची असेल ते सह एकूण महसुली जमा रुपये १६, १३,३१, १०२ इतकी असून प्रस्तावित खर्च १५ कोटी २१ लक्ष असून ९१ लक्ष ४३ हजार १०२ इतका महसुली समितीच्या अर्थसंकल्पास आदित्य जीवने बीड जिल्हा परिषदेचे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सोमवारी सदर माहिती सभागृहात दिली. यावेळी प्रकल्प संचालक संगितादेवी पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांच्यासह विभागप्रमुख उपस्थित होते.**

प्रारंभी मुख्य लेखा व वित्त अधिकारी सुरेश केंद्रे यांनी जिल्हा परिषदेच्या विभागनिहाय खर्चाच्या यावेळी बाबनिहाय तरतुद सादर केली. बांधकाम विभाग दोन कोटी ४४ लक्ष १४ हजार, शिक्षण विभाग १ कोटी ७४ लक्ष ४५०००, आरोग्य विभाग १९ लक्ष २०००, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग ०१ कोटी, समाज कल्याण विभाग ०३ कोटी ५१ लक्ष १००००, महिला व बालकल्याण विभाग ७४ लक्ष ४०००, कृषी विभाग ३० लक्ष ४० हजार, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग ७४ लक्ष ३०००, वनीकरण विभाग व व्याज १०,०००, पंचायत राज कार्यक्रम विभाग ०३ कोटी ९३ लक्ष ५६ हजार, लघु पाटबंधारे विभाग १०, ४००, एकूण १५ कोटी २१ लक्ष ८८,००० रुपयाच्या प्रस्ताविक खर्चास मान्यता देण्यात आली आहे. यावेळी अर्थसंकल्प मांडताना मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी, ग्रामविकासासाठी बीड जिल्हा परिषद कटिबद्ध असून विविध महत्वकांक्षी निर्णय घेण्यात आले आहेत ग्रामपंचायतीचे सक्षमीकरण महिलांचे सबलीकरण, शिक्षण आणि आरोग्य विभागा मार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची तरतुदीसह माहिती तसादर केली. जिल्हा परिषद अंतर्गत विविध विभागाच्या उपक्रमासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. ग्रामीण विकासाच्या विकासाला चालना देण्यासाठी आणि सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी आणि विकासासाठीच्या योजना राबविण्याचा अर्थसंकल्पाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहे. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी महसुली जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकीय तरतुदीचे सविस्तर वाचन करून उपस्थित विभाग प्रमुख आणि पत्रकारांना सविस्तर माहिती दिली.यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत डॉ. ज्ञानोबा मोकाटे, प्रकल्प संचालक राजेश मोराळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, प्रभारी कार्यकारी अभियंता बांधकाम (१), पशुसंवर्धन अधिकारी विजय देशमुख, आदीसह विभाग प्रमुख उपस्थित होते.



# संगीत साधना मंचची संगीत सभा उत्साहात



**अंबाजोगाई | प्रतिनिधी**


**संगीत साधना मंचच्या वतीने मराठवाड्यातील गायिका सध्या पुणे स्थित स्वरेशा पोरे (कुलकर्णी) यांची गायन सभा रविवारी उत्साहात संपन्न झाली.**

दुसऱ्या प्रहरात संपन्न झालेल्या समय चक्रानुसार राग ऐकण्याची या सभेत सुरुवातीला स्वरेशा पोरे यांनी सकाळच्या दुसऱ्या प्रहरातील राग नटभैरव विलंबित एकतालातील, समझत नही या बंदिशीने आपल्या गायनाची सुरुवात केली यानंतर नाचत नटराज या द्रुत तीन तालातील बंदीशीने रसिकांची मने वेधून घेतली. यानंतर स्वरेशा पोरे यांनी पंडित सी. आर.व्यास रचित राग बिलासखानी तोडी मधील ''त्यज रे अभिमान,जान गुनियन सो ही सर्व परिचय बंदिश सादर केली. यानंतर दृत एकतलातील ''जागत तोरे कारण बलमा अनोखी बंदी सादर केली या बंदीची वैशिष्ट्य म्हणजे, अस्थाई एक तालाच्या वजनाने जात होती आणि अंतरा मात्र तिनतालाच्या वजनाने जाऊन परत एकदा एक तालाच्या वजनाला भिडत होता., ही तालाची समज, रसिकांना सौ.स्वरेशा पोरे यांनी समजावून सांगितली आणि लिलाया करूनही दाखवली. यानंतर प्राणेश पोरे रचित ''गिनत हारे या अर्थपूर्ण आणि अप्रतिम बंदिशीने, समस्त रसिकांच्या मनाचा ठाव घेतला.यानंतर समर्थ रामदास रचित ''तानी स्वर रंगवावा या अभंगाने संगीत सभेची सांगता झाली. संवादिनीवर विश्वजीत धाट तर तबल्यावर रत्नदीप शिंगे यांनी साथसंगत केली. सभेच्या रंजकतेचा चढता आलेख उपस्थित रसिकांनी अनुभवला.

# संघर्षसुर्य पुस्तकाचा शुक्रवारी प्रकाशन सोहळा

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

**येथील तात्या-आभई आदर्श प्रतिष्ठान यांच्या संयोजनाने संवेदनशील, अभ्यासू व सजग व्यक्तिमत्त्व ऍड.राजेंद्रप्रसाद माणिकराव धायगुडे यांनी प्रत्येक स्तरातील वाचकास उपयुक्त असे लिहलेल्या संघर्षसूर्य (संघर्षातून आत्मविश्वास)या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शुक्रवार दि.२८ मार्च रोजी दुपारी ५ :००वा.कै.विलासराव देशमुख सभागृहात होणार असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प.शामसुंदर महाराज सोन्नर (ज्येष्ठ पत्रकार,संवेदनशील कवी व कीर्तनकार) राहणार आहेत.**



उद्घाटक म्हणून दिपक वजाळे (उपविभागीय अधिकारी,अंबाजोगाई) तर प्रमुख पाहुणे मा.डॉ.प्रा.डी.डी.पवार कुलसचिव,स्वा.रा.ती.मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तसेच दगडू लोमटे(प्रसिद्ध लेखक, साहित्यिक)मा.डॉ.प्रा. मुकूंद राजपंखे (इंग्रजी विभाग प्रमुख,य.च.म. अंबाजोगाई) मा.डॉ.प्रा.रामकृष्ण धायगुडे मा. सहसंचालक,नांदेड विभाग तसेच मा.डॉ.प्रा.व्ही.आर. पाटील (प्राचार्य, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय चिखलदरा)मा.डॉ.प्रा. हनुमंत सौदागर साहित्यिक,केज आदी मान्यवर उपस्थित राहणार असून या कार्यक्रमात दिपक अंकुशराव लोंढाळ,जगदीश शिवनारायण मंत्री बी.आर.मसने,संजय गंगाधर गिरी यांचा विषेश गौरव करण्यात येणार आहे. या प्रकाशन सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन तात्या-आभई आदर्श प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# सकल जैन समाजाच्या अध्यक्षपदी प्रेमचंद लोढा

## भगवान महावीर स्वामी जन्मकल्याणक महोत्सवाचे स्वागताध्यक्ष समाजभूषण नितीनचंद्र कोटेचा

बीड | प्रतिनिधी

भगवान महावीर स्वामी जन्मकल्याणक महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार असून त्या अनुषंगाने रविवार, २३ मार्च रोजी जैन धर्मातील सर्व संप्रदायातील प्रमुखांच्या उपस्थितीत जैन भवन येथे खेळीमेळीच्या वातावरणात बैठक संपन्न झाली. या बैठकीत सकल जैन समाजाच्या बीड अध्यक्षपदी प्रेमचंद लोढा यांची सर्वानुमते २०२५-२६ यावर्षाकरिता निवड करण्यात आली. तर भगवान महावीर स्वामी जन्मकल्याणक महोत्सवाच्या स्वागताध्यक्षपदी समाजभुषण नितीनचंद्र कोटेचा तर प्रोजेक्ट चेअरमनपदी पुनम नहार यांची निवड करण्यात आली.

या बैठकीमध्ये सकल जैन समाजाच्या अध्यक्षपदी सर्व संप्रदायातील प्रमुख व्यक्तींना एक वर्षासाठी पदभार देण्याचे सर्व संमतीने ठराव पास करण्यात आला. सन २०२५-२६ वर्षासाठी सकल जैन समाजाच्या अध्यक्षपदी प्रेमचंद उर्फ बाबूशेठ लोढा यांची सर्व संप्रदायाचे प्रमुख वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे सुभाषचंद दोडिया, समरथ जैन श्रावक संघाचे अध्यक्ष सतीशचंद छाजेड, दिगांबर जैन समाजाचे अध्यक्ष नरेंद्र महाजन, तेरापंथ सभा अध्यक्ष संजय समदरीया, विमलनाथ जैन मंदिर अध्यक्ष रमनिकलाल पडधरीया यांच्या उपस्थितीत अध्यक्षपदी सर्वानुमते ही निवड करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोज कोटेचा यांनी केले तर शेवटी आभार राहुल बोरा यांनी मानले. या बैठकीला सकल जैन समाजातील प्रतिष्ठीत नागरीकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



### रक्तदान शिबीर, दंत शिबीरासह विविध सामाजिक उपक्रम राबवणार-पुनम नहार

**या महोत्सवामध्ये शहरात भव्य मिरवणूक काढली जाणार आहे. तसेच रक्तदान शिबीर, दंत शिबीर, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, प्रबोधनपर व्याख्यान अशा विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले जाणार आहे, असे प्रोजेक्ट चेअरमन पुनम नहार यांनी सांगितले आहे.**

# आ. सुरेश धस यांच्या आमसभेत पाटोदा तहसीलला आदेश देऊन ही संजय निराधार विभाग जागेवरच ?

पाटोदा | प्रतिनिधी

संजय गांधी निराधार योजनेचा मुख्य उद्देश समाजातील दुर्बल घटकांना आर्थिक मदत करून त्यांचे जीवनमान उंचावणे असा आहे, अशा घटकांनी समाजातील इतर घटकांवर अवलंबून न राहता स्वतःला आत्मविश्वासाने जगता यावे म्हणून ही योजना महाराष्ट्र सरकार सामाजिक न्याय विभागाच्या वतीने सुरू केलेली आहे, या योजनेअंतर्गत, निराधार व्यक्तींना आर्थिक सहाय्य म्हणून सध्या दरमहा पंधराशे रुपये मानधन दिले जाते परंतु सप्टेंबर - आक्टोंबर २०२४ पासून ते आतापर्यंत पाटोदा तालुका व जिल्ह्यातील काही तालुक्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील लाभार्थ्यांना अद्याप मानधन मिळाले नसल्यामुळे अंध-दिव्यांग, अनाथ मुले, मोठ्या आजाराने ग्रस्त व्यक्ती, वयोवृद्ध, विधवा, घटस्फोटीत महिला, परित्यक्ता महिला, अत्याचारी महिला या सर्व लाभार्थ्यांवर सध्या वाढत्या महागाईमुळे उपासमारीची वेळ येवून ठेपली आहे. शासन स्तरावरून मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून लाडक्या बहिणींना दरमहा मानधन दिले जाते परंतु संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील लाभार्थ्यांना गत चार - चार महिन्यांपासून मानधन दिले जात नाही, वर्षभरात बारा महिनेही लाभार्थ्यांकडून दरमहा डिबीटीच्या नावाने कागदपत्रे गोळा करून काहिना काही तांत्रिक अडचणी पुढे करून त्यांची अवहेलना केली जात आहे हि राज्यासह देशाची फार ◀◀ पान ३ वर



निराधार विभाग तहसीलच्या तळमजल्यावर कधी येणार? पाटोद्यातील दिव्यांगाचा आमदार महोदयांना प्रश्न

# कोर्टातील केस मिटवण्यासाठी ८० वर्षीय वयोवृद्ध शिक्षकास धमक्या व खोटा गुन्हा दाखल करत दबाव टाकण्याचा प्रयत्न

अंबाजोगाई | प्रतिनिधी

श्री छत्रपती शिवाजी विद्यालय आडस या संस्थेत ४१ वर्षे सेवा करून आपल्या कार्याचा सर्वसामान्य वर ठसा उमटवणारे आंबेडकरवादी दलित चळवळीचे कट्टर समर्थक माणुसकी ही जात व मानवता हा धर्म असे अनेक व्याख्याते देऊन समाज प्रबोधन करणारे एक गाव एक पाणवठा कार्यक्रम ग्रामीण भागात राबविणारे विद्यार्थी प्रिय शिक्षक व कै. बाबुराव आडसकर यांचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून त्यांचा आडस व ग्रामीण परिसरात नावलौकिक आहे ते सोनवळा गावचे माजी सरपंच विठ्ठलराव साहेबराव देशमुख गुरुजी वय वर्ष ८० यांच्यावर कट रचून प्रदीप पतंगे यांनी खोटा गुन्हा नोंदवला आहे जो मुळीच झालेला नाही चंद्रकांत पतंगे व त्याचे दोन मुले प्रदीप पतंगे व विठ्ठल पतंगे यांच्यावर धारूर कोर्टात केस चालू आहे त्यांनी गुरुजींचा मुलगा गोकुळ देशमुख यांचे डोके फोडून जीवे मारण्याच्या उद्देशाने गंभीर रित्या जखमी केले होते यावेळी गुरुजींनी स्वतःच्या मुलाला समजावून सांगून भांडण न करता आपण कायद्यानेच लढू अशी विनंती केली की केस बोर्डावर आल्यामुळे वरील आरोपी गुन्हेगारी व गुंड प्रवृत्तीचे असल्यामुळे विठ्ठलराव देशमुख गोकुळ देशमुख यांना सातत्याने केस विड्रॉल करा अन्यथा तुमचे पाय तोडू खून करू अशा धमक्या सातत्याने देत आहेत केसत्र. मिटवण्यासाठी वाटेल ते प्रयत्न चंद्रकांत पतंगे विठ्ठल पतंगे प्रदीप पतंगे हे करत आहेत याच उद्देशाने दबाव तंत्र टाकण्यासाठी विठ्ठलराव देशमुख गोकुळराव देशमुख व अविनाश देशमुख यांच्यावर प्रदीप पतंगे यांने जो गुन्हा झालेलाच नाही तो खोटा गुन्हा दाखल केला आहे वरील तिघां व पतंगे चेही लोकेशन शोधले असता सत्य परिस्थिती समजून. पतंगे सातत्याने दबाव टाकत खोटे गुन्हे दाखल करत असल्याने ८० वर्षाचे वयोवृद्ध शिक्षक विठ्ठलराव साहेबराव देशमुख यांना मानसिक त्रास होत आहे या वर व खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या वर पोलीस प्रशासन कारवाई करेल का हा प्रश्न आहे नाहीतर तपासात आंधळ दळत आणि कुत्र पीठ खात असं होऊ नये.

# मार्च एंडमुळे बँका, पतसंस्थांची कर्जवसुली जोरात

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

सध्या सर्वत्रच सहकारी, राष्ट्रीयकृत बँका व पतसंस्थांनी सक्तीच्या कर्जवसुलीवर भर दिला आहे. वसुली पथके थेट कर्जदाराच्या घरी जाऊन वसुली करीत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. नवीन आर्थिक वर्षात नवीन व्यवहारांची सुरवात होणार असल्याने तत्पूर्वी जुने हिशेब पूर्ण करण्यावर भर दिला जात आहे. बँकांच्या या कर्जवसुलीमुळे मात्र कर्जदारांची धावपळ सुरू झाली आहे. कर्जवसुलीसाठी बँकांकडून नोटीस देऊन न्यायालयीन व फौजदारी कारवाई करण्याचे सांगितले जात आहे.अगदी चहा टपरी वाल्यापासून ते थेट शेतकऱ्यांपर्यंत सर्वजण मार्च महिना आला की अर्थिक अडचणीत सापडतात. अनेक जणांनी कर्ज घेऊन व्यवसाय, वाहने, घर बांधणे सुरू केलेले असतात सध्या अशांची कसरतच होते. कारण पोट भरायचे की,बँका, पतसंस्था, फायनान्स कंपन्यांचे हप्ते भरायचे, असा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण होतो.वसुलीमध्ये शिथिलता असलेल्या बँका,पतसंस्था, फायनान्स कर्जदारांकडे कर्जवसुलीचा तगादा लावतात. सक्तीची कर्जवसुली करतात कारण याच महिन्यात गृहकर्ज, वाहनकर्ज, पर्सनल लोन व इतर इलेक्ट्रॉनिक वस्तू खरेदी करण्याकरिता अनेकांनी कर्ज घेतलेले वसुल होते म्हणून अशांची वसुली कडक सुरू झाली असून सध्याही फायनान्स कंपन्यांकडून सक्तीची कर्जवसुली केली जाते आर्थिक वर्ष संपत असल्याने ३१ मार्चपर्यंत कर्ज हप्ता न भरल्यास असे कर्ज थकीतमध्ये मोडते. परिणामी अशा थकीत कर्जदाराची बाजारपेठेतील पतही घसरते. वेळेत कर्ज फेडू न शकणाऱ्या व्यक्तीला पुन्हा कर्ज मिळवण्यातही अडचणी येतात. त्यामुळे कर्जदारांकडूनही हप्ता भरण्यासाठी तारेवरची कसरत सुरू आहे. किमान व्याज तरी कमी होईल या अपेक्षेने प्रयत्न सुरू आहेत. घर खर्च, शिक्षण इतर गोष्टीमुळे खर्च वाढल्याने कर्ज भरणे जिकिरीचे होते. संस्थांचे प्रतिनिधी हप्ता भरण्यासाठी उशीर झालेल्या कर्जदारांच्या घरी जाऊन वसुली करत आहेत. वसुलीसाठी बँकांचा तगादा सुरू असल्याने काही कर्जदार तर नॉट रिचेबल झाल्याचे चित्र आहे. एकंदरीत बँका, पतसंस्थांच्या वसुली मोहिमेमुळे कर्जदारांची धावपळ सुरू झाली आहे.बँकांमध्ये आवश्यक कागदपत्रे व तारणाशिवाय कर्ज मिळत नाही. मार्चअखेर कर्जाची परतफेड करण्यासाठी मोठी धावपळ होत आहे

बेकायदेशीर सावकारीच्या समूळ उच्चाटनासाठी शासनाने दमदार पावले टाकली असल्याने सावकारांनी अवैधरित्या कर्जदार शेतकऱ्यांची मालमत्ता हडप करणे, कर्जावर अवास्तव दराने व्याज आकारणे, यावर पुरेसे निर्बंध आणता येत नव्हते.

# पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यासाठी जमाव विसर्जन रंगीत तालीम

**आंबजोगाई | प्रतिनिधी**

**दंगल सदृश्य परस्थिती निर्माण झाल्या नंतर पोलिसांना ही वेळीच हताळता यावी या साठी अंबाजोगाई शहर, ग्रामीण व बर्दापूर पोलीस स्टेशन च्या सर्व कर्मचाऱ्या साठी जमाव विसर्जन रंगीत तालीम घेण्यात आली.**

येथील यशवंत राव चव्हाण चौका नजिक असलेल्या क्रीडा संकुलाच्या मैदानात पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या मार्गदर्शना खाली उप विभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले यांच्या प्रमुख उपस्थिती मधे संपन्न झालेल्या या जमाव विसर्जन रंगीत तालीम प्रसंगी अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनंचे पोलीस निरीक्षक विनोद घोळवे, ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राम पडवळ, बर्दापूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार ससाने यांच्या आधीपत्या खाली शहर पोलीस स्टेशन, ग्रामीण पोलीस स्टेशन व बर्दापूर पोलीस स्टेशनचे सर्व महिला पुरुष कर्मचारी उपस्थित होते. या सर्व कर्मचाऱ्यांना जमाव विसर्जन रंगीत तालीम देण्या साठी बीड पोलिस मुख्यालयातून प्रशिक्षक म्हणून पो हे कॉ संजय रामराव भुतके यांची विशेष उपस्थिती होती. या वेळी मैदानावर आंदोलन कर्ता जमाव तयार करण्यात आला होता. हा जमाव शासनाच्या व पोलिसांच्या विरोधात घोषणा देत होता, जमावाला शांत करण्या साठी ध्वनी क्षेपका द्वारे सहायक पोलीस ◀◀ पान ३ वर



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# १० वर्षीय मुलीचे अपहरण करणाऱ्या तिघांना बेड्या; शिरूर पोलिसांची धडाकेबाज कारवाई



**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूरच्या जोशीवाडी येथून १० वर्षीय मुलीचे अपहरण करणार्या तिघांना शिरूर पोलिसांच्या तपास पथकाने अटक केली. अपहरण केलेल्या बालिकेची मुंबई येथून सुटका करून नातेवाइकांच्या ताब्यात दिली असल्याची माहिती शिरूरचे पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांनी दिली.

अटक केलेल्यांमध्ये दोन महिलांचा समावेश असून, लताबाई बसीर काळे, आकाश बसीर काळे आणि सुप्रिया ऊर्फ रॅम्बो आकाश काळे (सर्व रा. सोनेसांगवी, ता. शिरूर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याबाबत बालिकेच्या कुटुंबीयांनी शिरूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती.

दि. १३ मार्च रोजी सकाळी ८ ते दुपारी १ च्या दरम्यान शिरूर शहरातील जोशीवाडी येथून १० वर्षीय बालिकेचे अपहरण केल्याची फिर्याद दाखल करण्यात आली होती. याची दखल घेत पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांनी तपास पथकाला दिशानिर्देश दिले होते. पोलिस उपनिरीक्षक शुभम चव्हाण व पोलिस अंमलदार नितेश थोरात, विजय शिंदे, रवींद्र आव्हाड यांनी अपहृत बालिका व आरोपींचा शोध घेण्यासाठी शिरूर शहरामधील सुमारे १०० पेक्षा अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासले.

तांत्रिकदृष्ट्या तपास करीत असताना लता, आकाश आणि सुप्रिया या तिघांनी मोटरसायकलवर बालिकेचे अपहरण करून पळवून नेल्याचे सिद्ध झाले. पोलिस पथकाने या तीनही संशयितांना ताब्यात घेतले. त्यांना पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी बालिकेचे अपहरण केल्याची कबुली देऊन तिला बेलापूर-मुंबई येथे नातेवाइकांकडे ठेवले असून, ही मुलगी आमची असून, आम्ही उपचारासाठी दवाखान्यामध्ये जात आहोत, परत आल्यावर तिला घेऊन जातो, असे नातेवाइकांना सांगितले होते.

याबाबत तत्काळ पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांनी पोलिस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, पोलिस अंमलदार नितेश थोरात, विजय शिंदे, निरज पिसाळ, महिला पोलिस अंमलदार गीता सुळे यांचे पथक तयार करून अपहृत बालिका हिला तत्काळ बेलापूर मुंबई येथे जाऊन ताब्यात घेऊन नातेवाइकांच्या सुपूर्त केले.

ही कार्यवाही पुणे ग्रामीण पोलिस अधिक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलिस अधिक्षक रमेश चोपडे, शिरूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले, पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांचे मार्गदर्शनाखाली शिरूरचे गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, पोलिस हवालदार नाथसाहेब जगताप, महिला पोलीस अंमलदार गीता सुळे, पोलिस अंमलदार नितेश थोरात, विजय शिंदे, निरज पिसाळ, रविंद्र आव्हाड, सचिन भोई, अजय पाटील यांच्या पथकाने केली.

# कर्ज आहे म्हणून पोटगी नाकारता येणार नाही : न्यायालयाचा निष्कर्ष



**पुणे । प्रतिनिधी**

कर्ज आहे म्हणून पोटगी नाकारता येणार नाही. पतीची पत असल्यानेच कर्ज मिळाले आहे, असा निष्कर्ष काढत न्यायालयाने पत्नीला ९ हजार रुपये व दोन्ही मुलांना प्रत्येकी ७ हजार रुपये दरमहा अंतरिम पोटगी देण्याचा आदेश दिला. याबरोबरच मुलांचा शिक्षणाचा खर्च आणि तसेच मुलांना भेटण्यासाठी जाण्या-येण्याचा खर्चही द्यावा, असेही कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश के.व्ही.ठाकुर यांनी अदेशात म्हटले आहे.

पतीने न्यायालयात ३० लाख रुपये कर्ज असल्याचे सांगितले होते. या पार्श्वभूमीवर हा निष्कर्ष काढला आहे. विशेष म्हणजे पिंपरी न्यायालयाने कौटुंबिक हिंसाचाराच्या दाव्यात दरमहा १० हजार रुपये पोटगी देण्याचा आदेश दिला आहे. त्यामुळे न्यायालयाच्या वेगवेगळ्या आदेशानुसार पतीला दोन पोटगी द्यावी लागणार आहे.

वैभव आणि वैभवी (नावे बदलली आहेत) अशी दोघांची नावे आहेत. जून २०१५ मध्ये दोघांचा विवाह झाला. सुरूवातीला काही वर्षे संसार सुरळीत चालू होता. दोन मुलेही झाली. मात्र, त्यानंतर दोघांचे पटेनासे झाले. ३० जून २०१९ पासून दोघे वगळे राहू लागले. १२ नोव्हेंबर २०१९ रोजी पत्नीने घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला. त्यावेळी करोना काळ होता. पतीचे कपड्याचे दुकान आहे. त्याने ३० लाख रुपयांचे कर्ज असल्याचे आणि वार्षिक उत्पन्न ४ लाख ८६ हजार रुपये असल्याचे प्रतिज्ञापत्र न्यायालयात दाखल केले. ती मात्र कमविती नव्हती. तसेच, करोना काळापेक्षा आता पतीचे उत्पन्न जास्त झाले असल्याचेही पत्नीच्या वकील ॲड. राणी-कांबळे-सोनावणे यांनी न्यायालयाच्या निर्दशनास आणून दिले

# सायबर चोरट्यांकडून महिलेची फसवणूक; तब्बल दीड कोटींना घातला गंडा

**पुणे । प्रतिनिधी**



शासकीय ठेकेदार असल्याची बनावट कागदपत्रे दाखवून एका महिलेला कंपनीत गुंतवणूक करण्यास भाग पाडत एका महिलेची तब्बल एक कोटी ४३ लाख ७५ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. महिलेला गुंतवणूकीवर ६ ते १२ टक्के प्रति महिना नफा देण्याचे आमिष दाखविण्यात आले होते. याप्रकरणी खडकी पोलिसांनी सत्यम जोशी, देविका सत्यम जोशी, राहुल एरंडवणे, हर्षल चौधरी, कुलदीप कदम, वैभव इंगवले अशा नावाच्या व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ३८ वर्षीय महिलेने खडकी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार महिला खडकीतील औंध रस्ता परिसरात राहायला आहेत. त्या व्यावसायिक आहेत. यात २०२१ मध्ये तक्रारदार व यातील काही आरोपी हे एकत्रित व्यवसाय करत होते. त्यामुळे त्यांची ओळख होती. यावेळी आरोपींनी तक्रारदारांचा विश्वास संपादन केला होता. नंतर त्यांना आमच्या कंपनीला शासकीय कामाचा ठेका मिळाला आहे. या कामात गुंतवणूक केल्यास दरमहा सहा ते बारा टक्के व्याज देण्यात येईल, अशी बतावणी केली. नंतर आरोपींनी महिलेकडून वेळोवेळी एक कोटी ४३ लाख ७५ हजार रुपये घेतले.

महिलेने पैसे गुंतविल्यानंतर सुरुवातीला काही रक्कम परताव्या पोटी देण्यातही आली होती. त्यानंतर महिलेला परतावा देण्यात आला नाही. परतावा न मिळाल्याने आरोपींकडे गुंतविलेली रक्कम परत मागितली. तेव्हा आरोपींनी टाळाटाळ सुरू केली. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे नुकतीच तक्रार दिली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन चोरमोले तपास करत आहेत.


# ओतूर येथे वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद

**ओतूर । प्रतिनिधी**

येथील बाबित मळ्या मध्ये वनविभागाकडून लावण्यात आलेल्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी लहु ठोकळ यांनी दिली.

ओतूर येथील बाबित मळा येथे सोमवारी पहाटे पिजर्यात बिबट्या जेरबंद झाल्याची माहिती वनविभागाला तुकाराम गीते यांनी दिल्यानंतर ओतूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी लहु ठोकळ यांच्या मार्गदर्शनाखाली ओतूरच्या वनपाल सारिका बुट्टे ,ओतूरचे वनरक्षक मोहिनी वाकचौरे ,विश्वनाथ बेले ,दादाभाऊ साबळे वनकर्मचारी किसन केदार, गणपत केदार, फुलचंद खंडागळे, गंगाराम जाधव,रोहित लांडे यांच्या पथकांने तेथे जाऊन सदर जेरबंद बिबट्याला पिजर्यासह ताब्यात घेतले.

यावेळी आपदा मित्र वैभव अस्वार, विराज अस्वार, तसेच ग्रामस्थ गणेश गीते, संस्कार गीते विकास गीते,कुणाल गीते, पोपट मालकर, प्रदीप तांबे , सुनील मोरे यांच्या व इतरांच्या मदतीने पिंजऱ्यात जेरबंद बिबट्याला योग्य पध्दतीने ताब्यात घेऊन माणिकडोह बिबट निवारा केंद्रात सुखरूप दाखल करण्यात आले.सदर बिबट्या नर असून अंदाजे पाच ते सहा वर्ष वयाचा असल्याची माहिती



वनविभागाकडून देण्यात आली.

यावेळी ओतूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी लहु ठोकळ यांनी वनविभागा तर्फे असे आव्हान केले आहे की ओतूर व परीसरातील गावे ही बिबट प्रवण क्षेत्रात समाविष्ट असून सध्या परीसरातील गावात उस तोडणी बरोबरच कांद्ये काढणी ही मोठ्या प्रमाणावर सुरू आहे.कांदे काढणीसाठी मध्यप्रदेश,युपी,बिहार या राज्यांतील शेतमजूर मोठ्या संख्येने आपल्या परीसरात रोजगार निमीत दाखल झाले आहेत.तरी शेतकऱ्यांनी सदर मजूरांना बिबट बाबत माहिती द्यावी तसेच त्यांच्या राहण्याची सोय शेतात न करता बंदिस्त ठिकाणी करावी व भोवताली लाईट चा प्रकाश लख्ख असावा.

सदर परप्रांतीय शेतमजूरना आपल्या बरोबरी लहान मुलांची विशेष काळजी घ्यावयाच्या सुचना द्याव्या .रात्री अपरात्री बिबट प्रवण क्षेत्रातून फिरू नये.शक्य नसल्यास एकटे न फिरता समुहाने फिरावे.तसेच हातात बॅटरी,काठी सह मोठ्या आवाजाचे यंत्र बरोबर वाजवत ठेवावे जेणेकरून आजूबाजूला असलेले वन्य प्राणी बाजूला निघून जातील.बिबट्या किंवा इतर कोणताही वन्यप्राणी दिसल्यास त्याबाबत त्वरीत वनविभागाला माहिती द्यावी असे आवाहन त्यांनी यावेळी वनविभागातर्फे केले आहे.

# चाकूच्या धाकाने दुचाकीस्वार तरुणाला लुटले

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात लुटमारीच्या घटना वाढल्या आहेत. राज्यातील वेगवेगळ्या भागातून लुटमारीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातच आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. चाकूच्या धाकाने दुचाकीस्वार तरुणाला अडवून दोन अल्पवयीन साथीदारांसह मारहाण करत लुटल्याची घटना घडली आहे. हा प्रकार लोहगावमधील फॉरेस्ट पार्क परिसरात घडला आहे.



याप्रकरणी विमानतळ पोलिसांनी एकाला अटक केली आहे. चोरट्यांनी केलेल्या मारहाणीत तरुण जखमी झाला आहे. याप्रकरणी संतोष किसन राठोड (वय २१) याला अटक करण्यात आली. त्याच्याबरोबर असलेल्या दोन अल्पवयीनांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत २१ वर्षीय तरुणाने विमानतळ पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार तरुण लोहगावमधील फॉरेस्ट पार्क परिसरात राहायला आहे. रविवारी पहाटे साडेचारच्या सुमारास दुचाकीस्वार तरुण लोहगावमधील फॉरेस्ट पार्क रस्त्याने निघाला होता. फॉरेस्ट पार्क परिसरात दुचाकीवरुन आलेला चोरटा राठोड आणि त्याच्याबरोबर असलेल्या अल्पवयीनांनी तरुणाला अडवले. त्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. चाकूचा धाक दाखवून चोरट्यांनी त्याच्या पाकिटातील रोकड काढून घेतली. चोरट्यांच्या मारहाणीत तरुण जखमी झाला. घाबरलेल्या तरुणाने पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ निरीक्षक अजय संकेश्वरी यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेल्या राठोड याला पकडले आहे. अधिक तपास उपनिरीक्षक अक्षय सोनवणे करत आहेत.

# मुळशीतील कारखान्यांच्या समस्या सोडवा; कारखानदारांची मागणी

**पिरंगुट । प्रतिनिधी**

रस्ते, सुरळीत वीजपुरवठ्यासह मुळशी तालुक्यातील कारखानदारांच्या समस्या खासदार सुप्रिया सुळे, आमदार शंकर मांडेकर यांनी सोडवाव्यात, अशी मागणी कारखानदारांनी केली. पुणे ग्रामीण पोलिसांकडून मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यातील उद्योगांना चालना या उपक्रमांतर्गत उद्योजकांबरोबर बैठक घेण्यात आली. त्यात उद्योजकांनी समस्या सोडविण्याची मागणी केली. पिरंगुट औद्योगिक वसाहतीतील ब्रिटन्स कार्पेट या कंपनीत ही बैठक झाली.



या वेळी पोलिस उपअधीक्षक सुनीलकुमार पुजारी, पौडचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संतोष गिरिगोसावी, पिरंगुट इंडस्ट्रिअल असोसिएशनचे अध्यक्ष सतीश करंजकर, उद्योजक व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

उपअधीक्षक पुजारी म्हणाले की, ज्या ज्या कंपन्यांत महिला काम करत आहेत त्या त्या कंपन्यांत विशाखा समिती स्थापन करावी. महिलांचे प्रश्न व समस्या सोडवाव्यात. कंपनीला कोणत्याही प्रकारचा गुंडगिरीचा वा कामगार संघटनांकडून त्रास होत असेल तर पोलिसांना सांगावे.

पोलिस निरीक्षक गिरिगोसावी म्हणाले की, निर्भय आणि सुरक्षित वातावरण राखणे, हे पोलिसांचे कर्तव्य आहे. उद्योजकांनी अडचणी सांगितल्या पाहिजेत. कंपन्या ज्याला ठेका देणार आहेत, त्याची चारित्र्य पडताळणी करावी. गुन्हेगारांना काम दिले जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. या वेळी कंपन्यांच्या मालकांनी व प्रतिनिधींनी व्यथा मांडल्या. घोटावडे फाटा रस्ता, तेथील अतिक्रमणे यावर डिंपल कंपनीतील यादव यांनी तक्रार केली. घोटावडे फाटा येथे सिग्नल बसवावा, बसस्टॉप मुख्य चौकापासून पुढे हलवावा, अशी मागणी करण्यात आली.कारखानदारांनी महावितरणबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. वारंवार वीज जाते. यावर तोडगा काढावा, असे उद्योजकांनी सांगितले. पवनकुमार वनकुदळे यांनी परिसरात लवकरात लवकर अग्निशमन केंद्र तयार व्हावे, अशी मागणी केली.उरवडे ते मुकाईवाडी रस्त्याबाबत अनेकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. भरे पॉवर हाऊस येथील वन खात्याच्या जागेसमोरील रस्ता अनेक वर्षे खड्ड्यांत असल्याची तक्रार या वेळी करण्यात आली. दोन्ही रस्ते तातडीने नव्याने करण्याची साद उद्योजकांनी पोलिसांना घातली. भूगाव बाह्यवळण मार्ग लवकर करावा, अशी मागणी या वेळी करण्यात आली.अतुल काळे यांनी, अडिशनल लॅबोरेटरीत ४०-५० महिला काम करतात. ही कंपनी थोडी आत असल्याने पोलिसांनी गस्त घालावी, अशी मागणी केली. औद्योगिक परिसरातील बसथांब्यावर व रस्त्यावर पुरेशी लाइटची व्यवस्था असावी, असेही काहींनी सांगितले.चतुर्भुज कंपनीच्या ऋषिकेश पायगुडे यांनीही विचार व्यक्त केले. ट्रान्सफॉर्मर रिपेअरिंग कंपनीच्या किरण मारणे यांनी, अनेकदा महावितरणकडून ट्रान्सफॉर्मर दुरुस्तीसाठी येतात; पण विजेचे महत्त्व आणि परिस्थिती पाहून आपण त्याचे भाडे घेत नाही, असे सांगितले. भरे इंडस्ट्रिअल इस्टेटमधील रस्त्याची अडचण या वेळी मांडण्यात आली. अनिरुद्ध ढोले यांनी महावितरणच्या कारभाराबाबत तक्रार केली.

इंडस्ट्रिअल संघटनेचे अध्यक्ष सतीश करंजकर यांनी, कंपन्यांसाठी लवकरच स्वतंत्र फीडर होणार आहे. त्यामुळे अनेक समस्या सुटतील तसेच कासार आंबोली येथे भव्य व सुसज्ज अग्निशमन केंद्र उभे राहत आहे. त्याला थोडा काळ लागेल, अशी माहिती दिली.

# दुचाकीस्वाराकडून १० किलो गांजा जप्त




**पिंपरी । प्रतिनिधी**

दुचाकीस्वाराला अटक करून त्याच्याकडून पाच लाख ८८ हजार रुपये किमतीचा १० किलो १३८ ग्रॅम गांजा, दोन मोबाइल, दुचाकी जप्त केली.

पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने गुरुवारी (दि. २०) पिंपळे सौदागर येथे ही कारवाई केली. हरिश मगन सोनवणे (२७, रा. पिंपरीगाव, मूळ रा. वरवाडे, ता. शिरपूर, जि. धुळे) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी सांगवी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

अंमली पदार्थ विरोधी पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक विक्रम गायकवाड आणि पोलिस अंमलदार पिंपळे सौदागर परिसरात गस्त घालत होते. त्यावेळी संशयित हरिश सोनवणे हा दुचाकीवर सॅकबॅग व ट्रॅव्हलिंग बॅग घेऊन थांबलेला होता.

त्याचे नाव व तेथे थांबण्याचे कारण विचारले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्याच्या संशयास्पद हालचालीवरून पोलिसांनी त्याच्या बॅगची तपासणी केली. बॅगमध्ये १० किलो १३८ ग्रॅम गांजा मिळाला.

# अल्पवयीन मुलीवर २७ वर्षीय नराधमाकडून लैंगिक अत्याचार

**वाघोली । प्रतिनिधी**

पुणे पुन्हा एकदा अत्याचाराच्या घटनेने हादरलं. एका आठ वर्षीय चिमुकलीवर नराधमाने अत्याचार केल्याची घटना समोर आली असून परिसरात नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. राज्यभरात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यातच पुण्यातील वाघोली परिसरात शाळेत निघालेल्या मुलीवर एका नराधमाने अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे.

नराधमाने खाऊचं आमिष देऊन चौथीच्या विद्यार्थिनीवर अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पुण्यातील वाघोली परिसरात ही घटना घडली असून या प्रकरणात २७ वर्षीय आरोपीला वाघोली पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. स्वारगेट बस स्थानकात नुकत्याच झालेल्या धक्कादायक घटनेनंतर पुन्हा एकदा पुणे अत्याचाराच्या घटनेने हादरलं आहे.

याबाबत वाघोली पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, वाघोली परिसरात सकाळी सातच्या सुमारास विद्यार्थीनी घरुन शाळेत जाण्यासाठी निघाली होती. नेहमी प्रमाणे ती रस्त्याने जात होती. त्याच रस्त्यावर पिठाची गिरणी आहे. हा नराधाम या पिठाच्या गिरणीत काम करतो. नेहमीप्रमाणे ही चिमुरडी शाळेत



जाण्यासाठी निघाली. त्यावेळी या नराधमाने खाऊचं आमिष तिला दाखवलं. त्यानंतर तिला गिरणीच्या दिशेने घेऊन गेला आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

घटना घडल्यानंतर संबंधित चिमुकली शाळेत न जाता रस्त्यावर येऊन रडत होती. स्थानिक नागरिकांनी तिला कसंबसं शांत केलं. त्यानंतर ती रडत का होती? अशी विचारणा केली. त्यावेळी तिने नागरिकांना सर्व प्रकार सांगितला. या घटनेनंतर नागरिकांनी सतर्कता दाखवत पोलिसांना ही बाब कळवली. पोलिसांनी घटनेचं गंभीर्य ओळखत आरोपीला ताब्यात घेतलं आहे. त्याच्याकडे पोलिसी खाक्या दाखवत विचारणा केली, त्यानंतर त्याने केलेल्या प्रकाराची कबुली दिली.

या घटनेनंतर स्थानिक नागरिक आक्रमक झाल्याचं पहायला मिळालं. त्या नराधनमावर कठोर कारवाई करून त्याला फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांडून करण्यात आली आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी पुण्यातील स्वारगेट बस स्थानकात पहाटेच्या वेळी एका तरुणीवर अत्याचार करण्यात आला होता. तरुणाने मदत करण्याच भासवून तरुणीवर अतिप्रसंग केला. या घटनेने नागरिकांमधून एकच संतापाची लाट उसळली होती. ही घटना ताजी असतानाच पुन्हा एका वाघोलीत झालेल्या चिमुकलीवरील अत्याचाराच्या घटनेने पुण्यात संताप व्यक्त होत आहे.

# कर्मचाऱ्यांच्या भविष्यावर डल्ला! एक कोटी ९५ लाखांचा अपहार

**पुणे । प्रतिनिधी**

कर्मचाऱ्यांच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधीची रक्कम कपात न करता कंपनीच्या चालकांनी एक कोटी ९५ लाखांचा अपहार केल्याची घटना समोर आली आहे.




याबाबत दीपाली तिळवनकर यांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात सहाजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजीनगर परिसरातील कामगार पुरविणाऱ्या विशाल एक्स्पर्ट कंपनीच्या चालकांनी काही कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातून भविष्य निर्वाह निधीची रक्कम कपात केली.

परंतु ती रक्कम भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात जमा केली नाही. ही रक्कम सरकारी नियमानुसार कंपनीच्या चालकांनी जमा करायला हवी होती. मात्र, सर्वांनी मिळून ही रक्कम स्वतःच्या फायद्यासाठी वापरली, असा आरोप आहे. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक संजय पांढरे करीत आहेत.